**नगरसचिव**

**<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.४**

**जुलै २०२०**

**पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि.१७/७/२०२० रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**<u>– स्थायी समितीचे ठराव –</u>**

**<u>विषय क्र.१७</u>**

संदर्भ – १) मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि.२१/५/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५५,दि.२/६/२०२०

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपाच्या अतिक्रमण विभाग व मालमत्ता व्यवस्थापन विभागातर्फे मानवतेच्या दृष्टीकोनातून हजारो गरजू, बरोजगार, गरीब, अपंग अशा व्यक्तींना पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी व्यवसाय करण्यासाठी स्टॉल, पथारी, जागा, हातगाडी यांचे परवाने दिलेले आहेत. यासाठी मनपा योग्य ते शुल्क आकारते व हे सर्व परवानाधारक हे शुल्क भरत असतात. परंतू सध्या कोरोना विषाणूचे मोठे संकट आपल्या पुणे शहरासह संपूर्ण जगावरती आलेले आहे. सध्या केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक प्रशासन या संकंटाशी मोठया धीराने मुकाबला करीत आहे. सध्या मार्च महिन्यापासुन लॉक डाऊन चालू आहे. पुढे किती दिवस परिस्थिती पुर्वपदावर येण्यास वेळ लागेल हे सांगता येत नाही. या सर्व अडचणींमुळे या सर्व परवानाधारकांचे व्यवसाय पुर्णपणे बंद आहेत. या सर्वांचे कुटूंब त्यांच्या व्यवसायाच्या उत्पन्नावर अवलंबून आहेत. अनेक कुटूंबांना व्यवसाय बंद असल्यामुळे अनेक अडचणींना तोंड दयावे लागत आहे. अनेकांवरती उपासमारीची वेळ आली आहे. तरी या सर्व परवानाधारकांचे मानवतेच्या दृष्टीकोनातून मार्च महिन्यापासून ते पुढील सहा महिन्यापर्यंतचे शुल्क पूर्ण माफ करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र.१८</u>**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/७५ दि.२२/५/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८६,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

निविदा क्रमांक ३ सन २०१९–२० मधील मान्य ठेकेदार १.श्रीराम डिस्ट्रीब्युटर्स यांचेकडून जेनेरीक औषधे व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर ६६% इतका डिस्काउट (सूट) दर जीएसटी करासहित २. मे.एस.बी.जोशी ॲण्ड कंपनीकडून यांचेकडून ब्रॅन्डेड औषधे व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर २८.५०% इतका डिस्कांउट (सूट) दर जीएसटी करासहित घेऊन या दोन्ही निविदाधारकांकडून पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खात्याच्या आवश्यकतेनुसार व गरजेनुसार दैनंदिन स्वरूपात तातडीने औषधे व इतर साहित्यांची रक्कम रूपये २,००,००,०००/– ( अक्षरी रक्कम रूपय दोन कोटी फक्त ) पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये खरेदी करणेस ,त्यांच्याशी करार करणेस व खाली दिलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांची बिले अदा करणेस **मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्रमांक ६/११ दिनांक ८/४/२०२०** अन्वये **मान्यता प्राप्त झाली असून सदर बाब** मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**अर्थशिर्षक सन २०२०–२१**

**औषधे उपकरणी व साहित्य वगैरे.**

RE17F 153 A
अ. १ मनपा सभासदांसाठी.
मान्य तरतुद रक्कम रूपये २,८०,००,०००/-
RE17F 153 B
अ. २ मनपा सेवकांसाठी.
मान्य तरतुद रक्कम रूपये ६,५०,००,०००/- पैकी र.रु. २,००,००,०००/-

विषय क्र.१९

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/७६ दि.२२/५/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८७,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

निविदा क्रमांक ४ सन २०१९–२० मधील मान्य ठेकेदार १.श्रीराम डिस्ट्रीब्युटर्स यांचेकडून जेनेरीक औषधे व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर ६६% इतका डिस्कांउट (सूट) दर जीएसटी करासहित २. मे.एस.बी.जोशी ॲण्ड कंपनीकडून यांचेकडून ब्रॅन्डेड औषधे व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर २८.५०% इतका डिस्कांउट (सूट) दर जीएसटी करासहित घेऊन या दोन्ही निविदाधारकांकडून पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खात्याच्या आवश्यकतेनुसार व गरजेनुसार दैनंदिन स्वरूपात तातडीने औषधे व इतर साहित्यांची रक्कम रूपये २,००,००,०००/– ( अक्षरी रक्कम रूपय दोन कोटी फक्त ) पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये खरेदी करणेस ,त्यांच्याशी करार करणेस व खाली दिलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांची बिले अदा करणेस **मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्रमांक ६/१० दिनांक ८/४/२०२०** अन्वये **मान्यता प्राप्त झाली असून सदर बाब** मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२०–२१
RE17F 141
आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय योजनेअंतर्गत औषधे खरेदी करणे.
मान्य तरतुद रक्कम रूपये ७,५०,००,०००/– पैकी र.रु. २,००,००,०००/–

विषय क्र.२०

संदर्भ – १) डि.ओ.नंबर S.16030/18/2019-NAM Dated 6/3/2020
२)शासन परिपत्रक वित्त विभाग संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५९/२०/कोषा.प्रशा–५दि.१८ मार्च २०२०
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/७७ दि.२२/५/२०२० चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८८,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

**पुणे महानगरपालिकेच्या सर्व कन्टेनमेंट झोनमधील नागरीकांकरीता कोरोना प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन रोग प्रतिकारक शक्तीकामी केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालय मान्यताप्राप्त होमिओपॅथीच्या आर्सेनिक ३० औषधाच्या गोळया कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारक कामधेनू यांचेकडून खालील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे जीएसटी करासह रक्कम रूपये १४,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये चौदा लाख फक्त फक्त) पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ ३ (क) नुसार खरेदी करणेस, त्याचे बरोबर आवश्यक तो करारनामा करणेस व खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्रमांक ६/९६ दिनांक १२/५/२०२० अन्वये मान्यता प्राप्त झाली असून सदर बाब** मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
नागरीक जमा
RI -15 R 101-B

| अ.क्र. | खरेदी करावयाचे तपशील | खरेदी करावयाची संख्या | दर प्रति **बॉटल** जीएसटी करासह | एकुण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | **आर्सेनिक ३० १ ड्रॅम बॉटल** | ७०००० | २०/- | १४,००,०००/- |

**विषय क्र.२१**

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.

२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.४/७८ दि.२२/५/२०२० चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८९,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत सिंहगड वसतीगृह कोंढवा बु. येथे स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना व त्या केंद्रावर तीन पाळी मध्ये काम करणाऱ्या म.न.पा. सेवकांना दैनंदिन सकाळी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण देणेबाबत हे काम मोठया स्वरुपाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न काढता मे.न्यू स्टार केटरर्स प्रो.आशा संतोष थामी, स.नं. ५५ भाग्योदयनगर, कोंढवा खु., पुणे ४८ यांचेकडून र.रु. २०५/– प्रतिदिनी प्रति व्यक्ती + जी.एस.टी. व अन्य कर देणेस तसेच झालेल्या कामाचे दि.२८/४/२०२० पासून बिल खालील अर्थशिर्षकामधून आदा करणेस व खालील बाबी मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर होऊन मान्यता देण्यात येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी – RE17F 257

Covid – 19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

१) मे.न्यू स्टार केटरर्स प्रो.आशा संतोष थामी यांचेशी करार करणेस

२) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार दि.२८/४/२०२० पासून सदरचे काम संपेपर्यंत करणेस

**विषय क्र.२२**

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.

२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.४/७९ दि.२२/५/२०२० चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९०,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत ट्रिनिटी कॉलेज वसतीगृह कोंढवा बु. येथे स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना व त्या केंद्रावर तीन पाळी मध्ये काम करणाऱ्या म.न.पा. सेवकांना दैनंदिन सकाळी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण देणेबाबत हे काम मोठया स्वरुपाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न काढता मे.न्यू स्टार केटरर्स प्रो.आशा संतोष थामी, स.नं. ५५ भाग्योदयनगर, कोंढवा खु., पुणे ४८ यांचेकडून र.रु. २०५/– प्रतिदिनी प्रति व्यक्ती + जी.एस.टी. व अन्य कर देणेस तसेच झालेल्या कामाचे दि.९/५/२०२० पासून बिल खालील अर्थशिर्षकामधून आदा करणेस व खालील बाबीस मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर होवून मान्यता देण्यात येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी - RE17F 257

Covid – 19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

१) मे.न्यू स्टार केटरर्स प्रो.आशा संतोष थामी यांचेशी करार करणेस

२) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार दि.९/५/२०२० पासून सदरचे काम संपेपर्यंत करणेस

**विषय क्र.२३**

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.३/८० दि.२६/५/२०२० चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९१,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिका झोन क्र. ३ अंतर्गत धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत स्थापित केलेल्या आयसोलेशन/CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना व त्या केंद्रावर तीन पाळी मध्ये काम करणाऱ्या म.न.पा. सेवकांना दैनंदिन सकाळी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण देणेबाबत हे काम मोठया स्वरुपाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न काढता मे.संगम फाऊडेशन संस्था, बिबवेवाडी, ६४८/१० अप्पर सुपर, गणेश नगर, फ्लॅट नं. ६१, ६२ शॉप नं. १/२, पुणे ३७ यांचेकडून र.रु. २०५/- प्रतिदिनी प्रति व्यक्ती + G.S.T. व अन्य करासहित यानुसार देणेस तसेच झालेल्या कामाचे शिवाजी मराठा संस्थेचे मुलांचे वसतिगृह, तळजाई पायथा, पुणे दि.२३/४/२०२० पासून व श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वसतिगृह, आंबेगाव बु. पुणे, पुणे विद्यार्थी गृहाचे मुक्तांगण इंग्लिश स्कुल, अरण्येश्वर, पुणे, गेनुजी बेलदरे मनपा शाळा जांभूळवाडी रोड, पुणे, अभिनव इंग्लिश स्कूल, स.नं. १३ कात्रज बायपास रोड यांचे दि.१२/५/२०२० पासूनचे बिल खालील अर्थशिर्षकामधून आदा करणेस व खालील बाबी मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर होऊन मान्यता देण्यात येत आहे.

सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

१. मुख्य देखरेख वसुली वगैरे, थ आपत्ती व्यवस्थापन विभाग,

थ १. नैसर्गिक आपत्तीग्रस्त/अपघातग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत

RE11R101

१) मे.संगम फाऊडेशन संस्था, यांचेशी करार करणेस

२) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामधील बाबींची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३)(क) नुसार दि.२३/४/२०२० पासून शिवाजी मराठा संस्थेचे मुलांचे वसतिगृह व तसेच मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील उर्वरित ४ (अ.क्र. १,३,४ व ५) दि.१२/५/२०२० पासून सदरचे काम संपेपर्यंत करणेस

३) मुख्य खात्यामार्फत निविदा मान्य झाल्यापासून निविदा मान्य दराप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील.

**विषय क्र.२४**

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.३/८१ दि.२६/५/२०२० चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिका झोन क्र. ३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत सिंहगड इन्स्टीटयुटचे मुलांचे वसतीगृह रायगड, पन्हाळा व मुलींचे वसतीगृह ए.बी.सी. येथे स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी व दुपारी

चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण व लहान मुलांसाठी दूध व बिस्कीटे, गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटेल पुरविणे इत्यादी कामे हे काम मोठया स्वरुपाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न काढता अशा स्वरुपाचे काम करणाऱ्या तज्ञ एजन्सी/व्यक्ती १) मे.मॉर्डन केटरर्स २) मे.कॅफे साईलिला ३) मे./श्री.राधेय राजेंद्र नाईक या एजन्सीकडून दि.१२/४/२०२० पासून आणि स्थापत्य विषयक कामे मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचेकडून सन २०१९-२० च्या शेडयूल मान्य दराने व सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या अ.क्र. १ ते ९ बाबींचे अवलोकन करुन खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) ठेकेदार मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांनी हॉस्टेल इमारतीमधील खोल्या, संडास, बाथरुम, पॅसेज, इमारतीचा परिसर, साईड मार्जिन इ. सर्व मधील फरशी, भिंती, सिलींग, खिडक्या, दरवाजे, फॅन, संडास भांडी, बाथरुम ट्रॅप, इ.परिशिष्ट (अ) मध्ये दर्शविलेनुसार स्थापत्य विषयक कामे दर्शविली नुसार करुन दिलेली असुन त्याचा खर्च आणि परिशिष्ट (ब) नुसार दि.१५/०४/२०२० ते दि.३०/०४/२०२० अखेर सदर ठिकाणच्या कोरोंटाईन सेंटरवर आवश्यकतेनुसार मजुर पुरवुन कामे करुन दिली असुन त्यांचा एकुण खर्च र.रु.११,२८,६८०.७० आणि १२% जी.एस.टी.धरुन एकुण खर्च र.रु.१२,६४,१२२.३८ एवढा खर्च खालील अर्थशिर्षकातुन आदा करणेस.

2) सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सिंहगड हॉस्टेल मुलींचे वसतीगृह इमारत अे,बी,सी येथे दैनंदिन दाखल होणाऱ्या नागरिकांना तसेच त्या केंद्रावर काम करणाऱ्या म.न.पा.सेवकांना दैनंदिन दुपारचे व सायंकाळचे जेवण मे.मॉर्डन केटरर्स,(कोथरुड, पुणे) परिशिष्ट (क) प्रमाणे र.रु.१०,२०,९७५/- + १०%G.S.T. र.रु.११,२३,०७२.५० खालील अर्थशिर्षकामधुन आदा करणेस.

३) मा. महा. आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट (ड),(इ) व (फ)प्रमाणे मे.कॅफे साईलिला (प्रो.प्रा.भावेश अरुण पिंपळकर) सिंहगड कॉलेज येथील हॉस्टेल इमारत रायगड, पन्हाळा व महिला वसतीगृह इमारत अे,बी,सी येथे परिशिष्ट (ड),(इ) व (फ) मध्ये दर्शविल्यानुसार सकाळचा चहा, नाष्टा, दुपारचा चहा व लहान मुलांसाठी दुध व बिस्कीट तसेच बिस्लेरी पाणी बॉटल आणि रात्री अपरात्री पेशंट वाढल्यानंतर पुरक जेवण (दाळभात, मसाले भात, दाळ खिचडी, मॅगी) इ. स्वरुपात जेवण तयार करुन पुरविलेले आहे. सदर प्रमाणे त्यांचा एकुण खर्च र.रु.८,२१,००२/- होत असुन १०% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.९,०३,१०२.२० खालील अर्थशिर्षकावर आदा करणेस.

४) मा. महा. आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट (प) मध्ये दर्शविलेनुसार मे./श्री.राधेय राजेंद्र नाईक यांनी सिंहगड कॉलेज येथील रायगड, पन्हाळा या इमारतीमध्ये सकाळ व रात्रीचे जेवण, आवश्यकतेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल दि.२७/०४/२०२० व दि.२८/०४/२०२० रोजी रात्री ऐनवेळी पेशंट इमारत अे,बी,सी मध्ये वाढल्याने रात्रीचे जेवण असे जेवण पुरविले असुन त्याचा खर्च र.रु.७,८४,५४५/- इतका येत असुन १०% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.८,६२,९९९.५० इतका खर्च खालील अर्थशिर्षकावर आदा करणेस.

<u>अर्थशिर्षक - सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक</u>

१मुख्य देखरेख वसुली वगैरे, थ आपत्ती व्यवस्थापन विभाग,
थ १ नैसर्गिक आपत्तीग्रस्त/अपघातग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत.
RE11R101

५) मे. मॉर्डन केटरर्स, मे.कॅफे साईलिला (प्रो.प्रा.भावेश अरुण पिंपळकर)व मे./श्री.राधेय राजेंद्र नाईक यांचेशी करार करणेस.

६) वरील अ.क्र.१ व ५ ची अमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क)नुसार दिनांक.१२/०४/२०२० पासुन सदरचे काम संपेपर्यंत करणेस.

७) ज्या कामाचे निविदा नंतर मुख्य खात्यामार्फत काढले जातील त्या कामास निविदा दराप्रमाणे निविदा मान्य झाल्यापासून खर्च करणे बंधनकारक राहील.

<u>विषय क्र.२५</u>

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.३/८२ दि.२६/५/२०२० चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९३,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिका झोन क्र. ३ अंतर्गत वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत विविध ठिकाणी स्थापित केलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद आयसोलेशन /CCC केंद्रामध्ये दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना व त्या केंद्रावर तीन पाळी मध्ये काम करणाऱ्या म.न.पा. सेवकांना दैनंदिन सकाळी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण देणेबाबत हे काम मोठया स्वरुपाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न मागविता मे.तेजा हॉस्पिटेलिटी सर्व्हिसेस, गल्ली क्र. १०, शाहू कॉलनी, कर्वेनगर, पुणे ५२ यांचेकडून र.रु. २०५/– प्रतिदिनी प्रति व्यक्ती (G.S.T. व अन्य करासहित) यानुसार देणेस तसेच झालेल्या कामाचे दि.५/५/२०२० पासूनचे बिल खालील अर्थशिर्षकामधून आदा करणेस व खालील बाबीस मान्यता देणेस तसेच सदर बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक

१. मुख्य देखरेख वसुली वगैरे, थ आपत्ती व्यवस्थापन विभाग,

थ १. नैसर्गिक आपत्तीग्रस्त/अपघातग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत

RE11R101

१) मे.तेजा हॉस्पिटेलिटी सर्व्हिसेस यांचेबरोबर करार करणेस
२) वरील बाबींची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार दि.५/५/२०२० पासून सदरचे काम संपेपर्यंत करण्यास
३) मुख्य खात्यामार्फत निविदा मान्य झाल्यापासून निविदा दराप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील.

<u>विषय क्र.२६</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांचे आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/९५२५ दि.१४/३/२०२०

२) शासन निर्णय महसूल व वन विभाग सीएलएस–२०२०/प्र.क्र.१२३/म–३, दि.१६/३/२०२०

३) शासन परिपत्रक वित्त विभाग संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५९/२०/कोषा.प्रशा–५, दि.१८/३/२०२०

४) मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे मनपा यांचेकडील पत्र जा.क्र. १८७ दि.२९/४/२०२०

५) मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांची मान्यता ठराव क्र. ६/९९ दि.१४/५/२०२०

६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/८३ दि. २६/५/२०२० चे पत्र.

७) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९४,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत पुणे शहरात विविध ठिकाणी तयार करण्यात आलेल्या विलगीकरण कक्षासाठी अतितातडीची बाब म्हणून कापसाच्या गाद्या ठेकेदार श्री.संतोष पिसे, ठेकेदार मे.बालाजी मंडप डेकोरेटर्स, मे.राज एन्टरप्रायजेस व ठेकेदार श्री.महेश पवार यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये खरेदी केलेली बाब व त्यासाठी होणाऱ्या र.रुपये २१,००,०००/– च्या खर्चाची बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.२७</u>

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.

२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.३/८४ दि.२६/५/२०२० चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९५,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिका झोन क्र. ३ अंतर्गत वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत विविध ठिकाणी स्थापित केलेल्या आयसोलेशन सेन्टर्समध्ये व्हिडीओ शुटींग करणे हे काम दर्पण व्हिडीओग्राफी या एजन्सीकडून र.रुपये

३,०००/- प्रतिदिन या दराने व हॉस्टेल्सच्या खोल्यांमधील सामान एकत्र करुन संबंधित रेक्टरच्या देखरेखीखाली इतरत्र हलविणे हे काम मे.शुभम पॅकर्स अँड मुव्हर्स या एजन्सीकडून र.रु. २६०/- प्रति विद्यार्थी + G.S.T. या दराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये करुन घेणेस तसेच झालेल्या कामाचे दि.५/५/२०२० पासूनचे बिल खालील अर्थशिर्षकामधून आदा करणेस व खालील बाबीस मान्यता देणेस तसेच सदर बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

१. मुख्य देखरेख वसुली वगैरे, थ आपत्ती व्यवस्थापन विभाग,

थ १. नैसर्गिक आपत्तीग्रस्त/अपघातग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत

RE11R101

१) दर्पण व्हिडीओग्राफी व मे.शुभम पॅकर्स अँड मुव्हर्स यांचेबरोबर करार करणेस

२) वरील बाबीची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार दि.५/५/२०२० पासून सदरचे काम संपेपर्यंत करण्यास

**<u>विषय क्र.२८</u>**

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.

२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.३/८५ दि.२६/५/२०२० चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९६,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत पुणे म.न.पा.चे कै.मुरलीधर लायगुडे या हॉस्पीटल इमारत येथे स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/ccc क्रेंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी व दुपारी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण, लहान मुलांसाठी दुध व बिस्कीटे, गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे मोठ्या स्वरुपाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न काढता अशा स्वरुपाचे काम करणाऱ्या तज्ञ एजन्सी/व्यक्ती १)मे.मॉर्डन केटरर्स, २)श्रीमती निर्मला देशमुख ३) मे.कॅफे साईलिला, ४)मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन ५) मे.आदित्य सप्लायर्स ६)मे.समर्थ कन्स्ट्रक्शन या एजन्सी कडुन दि.१५/०३/२०२० व दि.२१/०३/२०२० पासुन आणि स्थापत्य विषयक कामे मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने आणि काही वस्तु सरळ बाजारातुन रास्त दराने खरेदी करुन पुरविणेस व सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या अ.क्र. अ ते ख बाबींचे अवलोकन करुन खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत कै.मुरलीधर लायगुडे हॉस्पीटल येथे श्रीमती. निर्मला देशमुख यांनी दि.२१/०३/२०२० पासुन दि.११/०४/२०२० अखेर पुरविलेले सकाळचा चहा, नाष्टा, दुपार व संध्याकाळचे जेवण व दुपारचा चहा इ.बाबी तयार करुन पुरविलेले असुन त्याचा खर्च परिशिष्ट (ड),(इ१),(इ२),(इ३)मध्ये दर्शविलेप्रमाणे र.रु.८२,०६५/- येत असुन +१०% जी.एस.टी.सह एकुण र.रु.९०,२७१.५० इतका खर्च खालील अर्थशिर्षकावर आदा करणेस.

२) मा. महा. आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट (फ) प्रमाणे मे.मॉर्डन केटरर्स(श्री.राम यत्नाळकर) कोथरुड, पुणे यांनी दि.१२/०४/२०२० पासुन दि.३०/०४/२०२० अखेर दुपारचे व रात्रीचे जेवण पुरविले असुन त्याचा खर्च र.रु.१,०१,८५०/- येत असुन + १०% जी.एस.टी.सह एकुण र.रु.१,१२,०३५/- इतका खर्च खालील अर्थशिर्षकावर आदा करणेस.

३) मा. महा. आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट (अ) व (ब) नुसार ठेकेदार मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन(श्री.संतोष लांडगे) यांनी स्थापत्य विषयक केलेल्या कामाचा व हॉस्पीटलसाठी लागणाऱ्या आवश्यक बाबी पुरविलेल्या असुन त्याचा खर्च र.रु.३,३९,८५६.७० एवढा होत असुन १२% जी.एस.टी.सह र.रु.३,८०,६३९.५० इतका खर्च खालील अर्थशिर्षकावर आदा करणेस.

४) मा. महा. आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट (क) प्रमाणे ठेकेदार मे.आदित्य सप्लायर्स (श्री.संजय सोनवळ) यांनी सदर ठिकाणच्या हॉस्पीटलसाठी लागणाऱ्या आवश्यक बाबी पुरविलेल्या

असुन त्याचा खर्च र.रु.२,४४,२३०.०० एवढा होत असुन १२% जी.एस.टी.सह र.रु.२,७३,५३७.६० इतका खर्च खालील अर्थशिर्षकावर आदा करणेस.

५) मा. महा. आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट (प) प्रमाणे ठेकेदार मे.सार्थक कन्स्ट्रक्शन (श्री.सुभाष पासलकर) यांनी सदर ठिकाणच्या हॉस्पीटल तयारी करताना परिसरातील राडारोडा काढणेसाठी मशिनरी व पुरक मजुर पुरवुन कामे करुन दिली असुन त्याचा खर्च र.रु.६३,७७२.०० एवढा होत असुन १२% जी.एस.टी.सह र.रु.७१,४२४.६४ इतका खर्च खालील अर्थशिर्षकावर आदा करणेस.

६) मा. महा. आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट (ख) प्रमाणे ठेकेदार मे.कॅफे साईलिला(प्रो.प्रा.भावेश अरुण पिंपळकर) यांनी पुणे म.न.पा.च्या नवले शाळा येथे निवारा केंद्रमध्ये सकाळ व दुपारचा फक्त चहा पुरविलेला असुन त्याचा खर्च र.रु.२१,९१०.०० एवढा होत असुन १०% जी.एस.टी.सह र.रु.२४,१०१.०० इतका खर्च खालील अर्थशिर्षकावर आदा करणेस.

अर्थशिर्षक – सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक

१मुख्य देखरेख वसुली वगैरे, थ आपत्ती व्यवस्थापन विभाग,

थ १ नैसर्गिक आपत्तीग्रस्त/अपघातग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत.

RE11R101

७) श्रीमती. निर्मला देशमुख, मे. मॉर्डन केटरर्स, मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन(श्री.संतोष लांडगे), मे.आदित्य सप्लायर्स (श्री.संजय सोनवळ), मे.सार्थक कन्स्ट्रक्शन (श्री.सुभाष पासलकर) व मे.कॅफे साईलिला (प्रो.प्रा.भावेश अरुण पिंपळकर) यांचेशी करार करणेस.

८) वरील अ.क्र.१ व ७ ची अमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क)नुसार दिनांक.२१/०३/२०२० पासुन सदरचे काम संपेपर्यंत करणेस.

विषय क्र.२९

संदर्भ – 1.पुणे मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर RFQ (Rrquest For Quotation) प्रसिध्द करणेस मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका ठराव क्र.06/05 दि.07/04/2020 ने मान्यता प्राप्त

2. पुणे मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला RFQ (Rrquest For Quotation)

3) RFQ (Rrquest For Quotation) अन्वये प्राप्त झालेल्या सर्वात कमी दरास मा.महापालिका आयुक्त,पुणे महानगरपालिका ठराव क्र.06/43 दि. 22/04/2020 अन्वये प्राप्त मान्यता.

4. मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका ठराव क्र. 6/76 दि. 04/05/2020 अन्वये मे. तेजस्विनी क्रिएशन यांचेकडून कापडी मास्क खरेदीस प्राप्त मान्यता

5. मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका ठराव क्र. 6/77 दि. 04/05/2020 अन्वये मे.फॅशनकिंग ब्रांडस् प्रा.लि. व मे. हिबीसकस मार्केटिंग प्रा.लि. यांचेकडून कापडी मास्क खरेदीस प्राप्त मान्यता

६. मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भांडार/८६ दि.२६/५/२०२० चे पत्र.

७) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९७,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३)क मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत उद्भवलेल्या परिस्थितीवेळी आपत्कालिन परिस्थितीमध्ये लागण झालेल्या रुग्णांच्या व संशयित रुग्णांच्या क्वारंटाईन कक्षाकरीता खालीलप्रमाणे तातडीने खरेदी करण्यात आलेल्या आवश्यक साहित्याची बिले आदा करणेस मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता घेण्यात आली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

1. मे.कल्पक एन्टरप्रायझेस यांनी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार पुरवठा केलेले साहित्य र.रु - 15,48,806/- ( सर्व करांसहित ) चे बिल त्यांना अदा करणेत आले आहे.
2. RFQ (Rrquest For Quotation) मध्ये प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराने कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आपत्कालीन परिस्थिती करीता क्वारंटाईन सेंटरसाठी तातडीचे अत्यावश्यक साहित्य मे.महावीर सेल्स यांचेकडून र.रु 10,00,000/-( सर्व करांसहित ) खरेदी करण्यात आलेले असून सदर रक्कम CSR फंडाचे जमा झालेल्या रकमेतून अदा करण्यात आले आहे.

3. RFQ (Rrquest For Quotation) मध्ये प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराने कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आपत्कालीन परिस्थिती करीता क्वारंटाईन सेंटरसाठी तातडीचे अत्यावश्यक साहित्य मे.महावीर सेल्स यांचेकडून र.रु 16,59,500/-( सर्व करांसहित ) खरेदी करण्यात आलेले असून सदर रक्कम त्यांना अदा करणेत आलेली आहे.
4. मे. तेजस्विनी क्रिएशन यांनी पुरवठा केलेले मास्क हे साहित्य मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार र.रु – 3,36,000/- सर्व करांसहित अदा करणेस.
5. मे. फॅशनकिंग ब्रांडस् प्रा.लि. यांनी पुरवठा केलेले मास्कचे रक्कम रुपये – 57,75,000/- पैकी 23,10,000/- अदा करण्यात आलेले असून उर्वरित रक्कम रुपये – 34,65,000/- अदा करणेस.
6. मे. हिबीसकस मार्केटिंग प्रा.लि. यांनी पुरवठा केलेले मास्क हे साहित्य मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार र.रु – 23,10,000/- अदा करणेस.
7. मे. महावीर सेल्स यांनी पुरवठा केलेले प्लास्टिक बकेट 20 लिटर - र.रु – 1,35,000/- व प्लास्टिक मग र.रु – 22,500/- असे एकूण र.रु – 1,57,500/- चे खरेदीस व त्याचे बिल अदा करणेस.

<u>विषय क्र.३०</u>

संदर्भ – 1. मा.स्थायी समिती, पुणे मनपा ठराव क्र.51 दि. 16/04/2020

2. मा.महापलिका आयुक्त यांचेकडील आदेश क्र. मआ/ साप्रवि/ 499 दि.03/05/2020

3. मे. अरिहंत सेल्स कार्पोरेशन यांचे दि. 06/05/2020 रोजीचे किराणा साहित्य कीटचे प्राप्त कोटेशन व त्यांना दि. 09/05/2020 देणेत आलेला कार्यादेश

4. मे. नितीनकुमार ॲन्ड कंपनी यांचे दि. 06/05/2020 रोजीचे किराणा साहित्य कीटचे कोटेशन

5. मे. प्रदीपकुमार ॲन्ड कंपनी यांचे दि. 06/05/2020 रोजीचे किराणा साहित्य कीटचे कोटेशन

6. मे. बी. जी.चितळे मिल्क प्रॉडक्ट्स यांचे दि. 06/05/2020 रोजीचे दुध पावडर या साहित्याचे यांचे प्राप्त कोटेशन व त्यांना दि. 09/05/2020 देणेत आलेला कार्यादेश

7. सोनाई ग्रुप, इंदापूर डेअरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट्स यांचे दि. 06/05/2020 रोजीचे दुध पावडर या साहित्याचे प्राप्त कोटेशन व त्यांना दि.09/05/2020 रोजी देणेत आलेला कार्यादेश

8. मेहता डेअरीज ( स्फूर्ती ) यांचे दि. 06/05/2020 रोजीचे दुध पावडर या साहित्याचे कोटेशन

9. मेहता मिल्क प्रोटीन्स LLP यांचे दि. 06/05/2020 रोजीचे दुध पावडर या साहित्याचे कोटेशन

10. प्रवीण मसालेवाले यांचे दि. 06/05/2020 रोजीचे मिरची पावडर या साहित्याचे प्राप्त कोटेशन व त्यांना दि. 09/05/2020 रोजी देणेत आलेला कार्यादेश

11. मे.श्री बालाजी ट्रेडिंग कंपनी यांचे दि. 06/05/2020 रोजीचे मिरची पावडर या साहित्याचे प्राप्त कोटेशन व त्यांना दि. 09/05/2020 रोजी देणेत आलेला कार्यादेश

12. मे.न्यू बालाजी होलसेल यांचे दि. 08/05/2020 रोजीचे मिरची पावडर या साहित्याचे प्राप्त कोटेशन व त्यांना दि. 09/05/2020 रोजी देणेत आलेला कार्यादेश

13. मे.पियुष डिस्ट्रीब्यूटर्स यांचे दि. 08/05/2020 रोजीचे साहित्याचे प्राप्त कोटेशन व त्यांना दि.09/05/2020 रोजी देणेत आलेला कार्यादेश

14. मा.अति.महापालिका आयुक्त ( ज ), पुणे मनपा यांचेकडील पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कंटेनमेंट झोनमधील नागरिकांसाठी अत्यावश्यक किराणा साहित्य कीट खरेदी करणेस ठराव क्र.8/47 दि. 08/05/2020 अन्वये प्राप्त मान्यता.

१५. मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भांडार/९२ दि.२९/५/२०२० चे पत्र.

१६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२००,दि.२/६/२०२०

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३)क मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रादुर्भावामुळे आपत्कालिन परिस्थिती करीता पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कंटेनमेंट झोनमधील झोपडपट्टीतील नागरिकांसाठी खालीलप्रमाणे अत्यावश्यक ग्रॉसरी कीट – किराणा साहित्य खरेदी करणेस व त्यापोटी होणारी बिले अदा करणेस मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता घेण्यात आली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

1. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आपत्कालीन परिस्थिती करीता पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कंटेनमेंट झोनमधील झोपडपट्टीतील नागरिकांसाठी अत्यावश्यक किराणा साहित्य कीटचे दरास.
2. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आपत्कालीन परिस्थिती करीता पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कंटेनमेंट झोनमधील झोपडपट्टीतील नागरिकांसाठी एकूण 70,000 अत्यावश्यक किराणा साहित्य - ग्रॉसरी कीट महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67( 3 ) ( क ) नुसार खरेदी करणेस.
3. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आपत्कालीन परिस्थिती करीता पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कंटेनमेंट झोनमधील झोपडपट्टीतील नागरिकांसाठी आणखीन आवश्यकता भासल्यास त्यानुसार वाढीव अत्यावश्यक किराणा साहित्य कीट खरेदी करणेस.
4. अत्यावश्यक किराणा साहित्य कीट पुरविणेची निकड लक्षात घेता कोटेशन दिलेले व जे पुरवठादार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या दराने सदर साहित्याचा पुरवठा करण्यास तयार आहेत अशा सर्व पुरवठादारांकडून खरेदी करणेस तसेच त्याचेसोबत करारनामा न करता व त्यांचेकडून कोणतीही अनामत रक्कम न घेता त्यांना बिल अदा करणेस.
5. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आपत्कालीन परिस्थिती करीता पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कंटेनमेंट झोनमधील झोपडपट्टीतील 70,000 नागरिकांसाठी अत्यावश्यक किराणा साहित्य कीट तातडीने मे. अरिहंत सेल्स कार्पोरेशन, यांचेकडून तसेच जे पुरवठादार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या दराने सदर साहित्याचा पुरवठा करण्यास तयार आहेत अशा सर्व पुरवठादारांकडून खरेदी करणेस. तसेच दुध पावडर हे साहित्य चितळे मिल्क प्रॉडक्ट्स व सोनाई ग्रुप, इंदापूर डेअरी अॅन्ड मिल्क प्रॉडक्ट्स लिमिटेड या दोन्ही संस्थाकडून तसेच मिरची पावडर हे साहित्य प्रवीण मसाले यांचेकडून तसेच रक्कम रुपये – 5,60,00,000/- ( अक्षरी रक्कम रुपये – पाच कोटी साठ लक्ष मात्र ) पर्यंत खरेदी करणेस व बिल त्यांना अदा करणेस.
6. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आपत्कालीन परिस्थिती करीता पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कंटेमेंट झोनमधील झोपडपट्टीतील नागरिकांसाठी अत्यावश्यक किराणा साहित्य खरेदी करणेकामी होणारे बिल कोव्हीड 19 करीताचे खर्चासाठीचे पुणे महानगरपालिकेकडील खाली नमुद केलेल्या वर नमूद केलेल्या अर्थशिर्षकीय संकेताकावर ( बजेट हेड ) वर खर्ची टाकणेस.

   अर्थशिर्षक
   RE17F 257
   Covid – 19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी खर्च
7. वरील सर्व संस्थांना कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आपत्कालीन परिस्थिती करीता क्वारंटाईन सेंटरसाठी व पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कंटेनमेंट झोनमधील झोपडपट्टीतील नागरिकांसाठी तातडीने पुरवठा करण्यात येणाऱ्या ग्रॉसरी कीट – किराणा ची होणारी बिले त्यांना अदा करणेस.

<u>विषय क्र.३१</u>

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९३ दि.२९/५/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०१,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महापालिकेचे आरोग्य विभागाअंतर्गत असणाऱ्या सर्व दवाखाने/रुग्णालये/प्रसूतिगृहे याठिकाणी देण्यात येणारी आरोग्य सेवा सुविधा दि.३१/८/२०२० अखेरपर्यंत मोफत करण्याची मुदत वाढवून मिळणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.३२</u>

संदर्भ – १) मा.श्रीनाथ भिमाले व मा.दिपक पोटे यांचे दि. १६/४/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ५२ दि. १६/४/२०२०
३) मा.दिपक पोटे व मा.महेंद्र पठारे यांचे दि. २/६/२०२० चे फेरविचाराचे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०३,दि.२/६/२०२०

----

मा.स्थायी समिती ठराव क्र. ५२ दि. १६/४/२०२० चा फेरविचार करण्यात आला.

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

सध्या संपुर्ण जगभरामध्ये थैमान घातलेल्या महामारी कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर आपल्या देशामध्ये लॉकडाउनच्या धर्तीवर अनेक विविध प्रकारचे निर्बंध लादण्यात आलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने अनेक नोकरदार, व्यावसायिक व समाजातील इ. घटक हा संपुर्ण देश लॉकडाउन असल्यामुळे विनाकाम घरीच आहे. यामुळे सदर घटकांना मोठया प्रमाणावर आर्थिक संकटास सामोरे जावे लागत आहे. याबाबत संपुर्ण देशात केंद्र शासन व राज्य शासनाने अनेक निर्बंध शिथिल केलेले आहेत.

याचअनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या मालमत्ता करामध्ये खालील नमूद केलेल्या मुदद्यांप्रमाणे सध्यःस्थितीमध्ये अंमलबजावणी करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) चालू आर्थिक वर्षामध्ये माहे मे पर्यंत देण्यात येणारी ५ ते १० टक्के सवलत ही मुदत दि. ३१/०५/२०२० अखेर पर्यंत आहे. सदर मुदत दि.३१/५/२०२० ऐवजी दि.३०/६/२०२० अशी १ महिने वाढविण्यात यावी.
२) त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीचा कर न भरल्यास दि.१ जुलै पासून आकारण्यात येणारी शास्ती या वर्षापूर्तीच दि. १ ऑगस्ट २०२० पासून आकारण्यात यावी.

तसेच मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ५२ दि. १६/४/२०२० चा दुरुस्त करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.३३</u>

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९८ दि.२/६/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०७,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

कोविड –१९ (कोरोना) विषाणूचा प्रादुर्भाव पाहता सद्यस्थितीतील तसेच भविष्यात तयार करण्यात येणाऱ्या विलगीकरण कक्षातील अंतर्गत वार्डमधील रूग्णांचे कपडे धुलाईचे काम पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालयाकडील कपडे धुलाई सन २०१९–२० चे मान्य ठेकेदार मे.क्वालिटी इंडस्ट्रीयल लॉण्ड्री यांचेकडून प्रति कपडा नग र.रू.३२/– नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७,(३)(क) अन्वये करण्यात येत असून या कामी आवश्यक तो करारनामा करण्यात आलेला आहे . सदरची बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.३४</u>

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९ दि.२/६/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०८,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

क्रस्ना डायग्नोस्टीक सेंटर प्रा.लि. यांचेकडून कोवीड – १९ साठी मोफत वातानुकूलित बस कुशल तंत्रज्ञासह दि.३१ जुलै २०२० पर्यंत रुग्णांची तपासणी करणेसाठी खालील बाबीस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) क्रस्ना डायग्नोस्टीक सेंटर प्रा.लि. यांचे प्रस्तावातील Package-1 मधील तपासणी प्रति रुग्ण रक्कम रु. ४००/- प्रमाणे करणेस
२) सदर कामी CSR अंतर्गत निधी उपलब्ध न झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) (क) अन्वये खास बाब म्हणून मान्यता देणेस
३) भवानी पेठ परिसरामध्ये Pilot Project म्हणून ५००० तपासणी केल्यानंतर त्याचे फलनिष्पत्ती नंतर प्रकरणी पुढील निर्णय घेणेस
४) सदर कामी शासनाकडून निधी उपलब्ध करुन घेणेस

विषय क्र.३५

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०० दि.२/६/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०९,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिकेच्या विविध दवाखाने,रूग्णालयांसाठी एन ९५ मास्क्,पीपीई किट, व्हिटिएम किट कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्य नमुद केल्याप्रमाणे १.आर.एस.एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ५,४०,०००/- २.लक्ष्मी मेडिकल्स यांचे रक्कम रूपये २८,६५,०००/- ३.श्री एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ५,९४,०००/- ( जीएसटी करासह )अ एकुण रक्कम रूपये ३९,९९,०००/- ( अक्षरी रक्कम रूपये एकोणचाळीस लाख नव्यानव हजार फक्त ) पर्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करार करण्यात आला आहे.

सदर बाबीस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

लेखाशिर्ष :- नियोजन विभाग-मागणी क्र.ओ-१० ४५१५
इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२ - सामुहिक विकास पंचवार्षिक योजनाअंतर्गत राज्य योजनाअंतर्गत योजना
(१)बहुउददेशीय कार्यक्रम (०० ) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम
(४५१५ ००१२) ( योजनाअंतर्गत) (दत्तमत ) ५३ मोठी बांधकामे.
मान्य तरतूद रक्कम रूपये ५०,००,०००/- पैकी ३९,९९,०००/-

विषय क्र.३६

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०१ दि.२/६/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२१०,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिकेच्या विविध दवाखाने,रूग्णालयांसाठी हॅन्ड सॅनिटायझर,एन ९५ मास्क्, पीपीई किट,व्हिटिम किट कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १.आर.एस.एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ५,४०,०००/- २.सुपर प्लॅस्टिक्स कॉर्पोरेशन यांचेकडून रक्कम रूपये २३,२५,०००/- ३.अरिहंत केमिस्ट यांचेकडून रक्कम रूपये ३,५७,५००/- ४.श्री एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ३,३०,०००/- ( जीएसटी करासह ( असे एकुण रक्कम रूपये ३५,५२,५००/- ( अक्षरी रक्कम रूपये पस्तीस लाख बावन्न् हजार पाचशे फक्त ) पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क ) नुसार खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करारनामा करण्यात आला आहे.

सदर बाबीस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खर्चाचे अर्थशिर्षक :-

लेखाशिर्ष नियोजन विभाग-मागणी क्र.ओ-१० ४५१५ ,

इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२ – सामुहिक विकास पंचवार्षिक योजनाअंतर्गत राज्य योजनाअंतर्गत योजना,
(१)बहुउददेशीय कार्यक्रम (००) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम (४५१५००१२)
( योजनाअंतर्गत) (दत्तमत ) ५३ मोठी बांधकामे.
मान्य तरतूद रक्कम रूपये ५०,००,०००/– पैकी ३५,५२,५००/–

विषय क्र.३७

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०२ दि.२/६/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२११,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने,रूग्णालये व प्रसुतिगृहांसाठो कोव्हिड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरीता पीपीई किटस, एन ९५ मास्क,इन्फ्रारेड थर्मामिटर, व्हिटिम कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १.आर.एस.एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ९,००,०००/- २. आकांक्षा मे सिस्टिम्स प्रा.लि._यांचेकडून रक्कम रूपये ४६,५०,०००/- ३. कॉम्युकेअर सोल्युशन्स यांचेकडून रक्कम २१,२४,०००/- ४.श्री एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये १९,८०,०००/- (जीएसटी करासह) असे एकुण र ९६,५४,०००/- पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३( (क) नुसार खरेदी करण्यात आलेली आवश्यक तो करारनामा करण्यता आला आहे.

सदर बाबीस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**अर्थशिर्षक सन २०२०-२१**
RE 17-31-F/RF-167
**महापौर निधी.**
**मान्य तरतूद रक्कम रूपये ४,००,००,०००/- पैकी ९६,५४,०००/-**

विषय क्र.३८

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०३ दि.२/६/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२१२,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिकेच्या डॉ.नायडू सांसर्गिक रूग्णालयासाठी इन्फ्रारेड थर्मामिटर कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे क्वॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि. यांचेकडून जीएसटी करासह रक्कम रूपये ६,९३,८४०/– पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क ) अन्वये खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करारनामा करण्यात आला आहे.

सदर बाबीस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खर्चाचे अर्थशिर्षक :-
लेखाशिर्ष नियोजन विभाग–मागणी क्र.ओ–१० ४५१५,
इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२ – सामुहिक विकास पंचवार्षिक योजनाअंतर्गत राज्य योजनाअंतर्गत योजना,
(१)बहुउददेशीय कार्यक्रम (०० ) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम
(४५१५ ००१२) ( योजनाअंतर्गत) (दत्तमत ) ५३ मोठी बांधकामे.

विषय क्र.३९

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०४ दि.२/६/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिकेच्या विविध दवाखाने,रूग्णालयांसाठी पीपीई किटस, Sterile Surgical Gloves,एन-९५ मास्क, फेसमास्क कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १.कल्याणी गारमेंटस यांचेकडून रक्कम रूपये ३,७२,०००/- २. ओसक्युअर हेल्थकेअर यांचेकडून रक्कम रूपये ३,६०,०००/- ३.क्वॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि.यांचेकडून रक्कम रूपये ४,१४,०००/- ४. नमो फार्मा यांचेकडून रक्कम रूपये ८,५०,०००/- ( जीएसटी करासह ( असे एकुण रक्कम रूपये १९,९६,०००/- पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३( (क) नुसार खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करारनामा करण्यात आला आहे.

सदर बाबीस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खर्चाचे अर्थशिर्षक :-

लेखाशिर्ष नियोजन विभाग-मागणी क्र.ओ-१०

इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च

१०२ – सामुहिक विकास पंचवार्षिक योजनाअंतर्गत राज्य योजनाअंतर्गत योजना,

(१)बहुउददेशीय कार्यक्रम (००) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम

(४५१५ ००१२) ( योजनाअंतर्गत) (दत्तमत ) ५३ मोठी बांधकामे.

<u>विषय क्र.४०</u>

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०५ दि.२/६/२०२० चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२१४,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ येरवडा क्षेत्रिय कार्यालयासाठी,प्रभाग क्रमांक १९ भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयासाठी,प्रभाग क्रमांक २० ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालयासाठी पीपीई किटस,Viral Transport Medium, इन्फ्रारेड थर्मामिटर, कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १. एसबीअे एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ११,९९,७००/- २.बिग बिअर फुडस प्रा.लि. यांचेकडून रक्कम रूपये १३,८७,५००/- ३.न्यु अमर एजन्सीज यांचेकडून रक्कम रूपये ४,१०,६४०/- (जीएसटी करासह) असे एकुण रक्कम रूपये २९,९७,८४०/- पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) अन्वये खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करारनामा करण्यात आला आहे.

सदर बाबीस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खर्चाचे अर्थशिर्षक :-

लेखाशिर्ष नियोजन विभाग-मागणी क्र.ओ-१०

४५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च

१०२ – सामुहिक विकास पंचवार्षिक योजनाअंतर्गत राज्य योजनाअंतर्गत योजना

(१)बहुउददेशीय कार्यक्रम (००) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम

(४५१५ ००१२) ( योजनाअंतर्गत) (दत्तमत ) ५३ मोठी बांधकामे.

<u>विषय क्र.४१</u>

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०७ दि.२/६/२०२० चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२१६,दि.२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोविड १९ रुग्णांची वाढणारी संख्या व वाढत्या मृत्युचे प्रमाण कमी करणेसाठी करावयाच्या उपाययोजने अंतर्गत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार सर्वेक्षण करणाऱ्या सेविकांना मानधन अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) कंत्राटी नर्सेस व आशा कार्यकर्ती या प्रशिक्षित असल्याने त्यांचेकडून थर्मलगन ने तापमान घेणे, पल्स ऑक्सिमीटर ने O2 सॅच्युरेशन, रक्तदाब तपासणे, रॅंडम शुगर तपासणे इ. कामे करून घेणेस.

२) तसेच समूह संघटिका, बचत गटातील महिला व अंगणवाडी सेविका या प्रशिक्षित नसल्याने त्यांना सुरुवातीस कंत्राटी नर्सेस व आशा कार्यकर्ती यांचे समवेत काम करणेस व त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष तपासणीचे कामकाज करणेस.

३) क्षेत्रिय कार्यालयांतर्गत ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येनुसार अंदाजे १३०० व आवश्यकतेनुसार अधिक सेवक नेमून ज्येष्ठ नागरिकांची तपासणी करणेस.

४) प्रतिसेवक प्रतिदिन प्रतिघर २ रु. याप्रमाणे २ महिनेकरिता मानधन अदा करणेस व सदर कामाकरिता अंदाजे र.रु.६७,६०,००० /- इतके खर्च करणेस.

५) उपरोक्त मानधन (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) अन्वये) महसूल कामांसाठी RE17F257 Covid-19 अंतर्गत अत्यावश्यक महसुली कामासाठी (खर्च) या अर्थशीर्षकावर खर्ची टाकणेस.

<u>विषय क्र.४२</u>

संदर्भ – १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीएमआरडी-३३१५/प्र.क्र.६९ /नवि-७, मंत्रालय, मुंबई दिनांक ९ फेब्रुवारी २०१८.

२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २६/०३/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

३) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीएमआरडी-३३१८ /प्र.क्र.४९/(२)नवि-७ , मंत्रालय, मुंबई दिनांक १८ जुलै २०१८ रोजीचे पत्र.

४) पुणे महानगरपालिका सभा ठराव क्रमांक ९२५ दिनांक १७/१२/२०१८.

५) COVID -19 अनुषंगाने प्रतिबंधात्मक Lockdown बाबत महाराष्ट्र शासन आदेश क्रं. DMU/2020/CR.92/DisM-1 दि.०२/०५/२०२०.

६) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडील पत्र जा.क्र. EG/युचो/०६.१८/प्र.क्र. २६१ /२७८/शाखा-१ दिनांक ०५/०५/२०२०.

७) मा. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांचेकडील पत्र क्रं. EG/युचो/०६.१८/प्र.क्र. २६१ /२७९/शाखा-१ दिनांक ०८/०५/२०२०.

८) मा.महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना पाठविलेले पत्र जावक क्रमांक ६९ दिनांक २६/०५/२०२०

९) मा.महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडील पत्र जावक क्रं. इंजि-२/पुमेला-३/०५.२०/प्र.क्र.२६१/२९५/शाखा -१ दिनांक – २६/०५/२०२०.

१०) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांनी मा.महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना पाठविलेले पत्र जा.क्र.पीआरडी/३३१८/प्र.क्र.११४ दिनांक २६ मे २०२०.

११) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्रकल्प)/९०दि.२८/५/२०२० चे पत्र.

१२) मा.दिपक पोटे, मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.राजेंद्र शिळीमकर, मा.प्रकाश ढोरे यांची दि.९/६/२०२० ची उपसूचना.

१३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२१,दि.९/६/२०२०

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लाईन-३ या मेट्रो मार्गिकेवरील सावित्रीबाई फुले विद्यापीठ चौकातील वाहतुक समस्या सोडविण्यासाठी पूल व मेट्रोचे एकात्मिक काम करणे व तेथील अस्तित्वातील पूल तोडणेचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(१) कोविड- १९ प्रतिबंधात्मक लॉकडाऊन कालावधीत वाहतुक पोलिसांच्या सहकार्याने विद्यापीठ चौक व ई स्क्वेअर येथील अस्तित्वातील उड्डाणपूल पुणे प्रदेश विकास प्राधिकरण यांना पाडण्यास परवानगी देणेस.

(२) पूल पाडल्यानंतर तेथील राडारोडा उचलून रस्ता दुरूस्तीचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी करणेस.

(३) अस्तित्वातील पूल सेगमेंटल ( Segmental ) स्ट्रक्चर स्वरूपात बांधण्यात आलेला असल्याने , पूल पाडतेवेळी सदर सेगमेंटलचा पुनर्वापराबाबत विचार होणेस.

(४) विद्यापीठ चौक येथील एकात्मिक विकसन आराखडा बाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी मा. महापौर, मा. पक्षनेते ,मा. पदाधिकारी , महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका यांचेशी चर्चा करून अंतिम पर्याय निश्चित करणेस.

(५) सद्या अस्तित्वातील पूल पाडल्यानंतर बांधण्यात येणाऱ्या पूलाचा खर्च म.न.पा.मार्फत करण्यात येऊ नये तसेच नविन पूलाचे ईस्टिमेट/टेंडर इत्यादी बाबी व वाहतुकीचे नियोजन झाल्यानंतरच पूल पाडण्यात यावा.

<u>विषय क्र.४३</u>

संदर्भ – १) मा.सौ.रुपाली धाडवे व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.१०/२/२०२० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. २२५६ दि. १७/२/२०२०

३) मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/११० दि. ३/६/२०२० ने पाठविलेला अभिप्राय

४) मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.राजेंद्र शिळीमकर व मा.बाळा ओसवाल यांची दि.९/६/२०२० ची उपसूचना.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२५,दि.९/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या बिबवेवाडी/धनकवडी पुनर्वसन योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या निवासी व बिगर निवासी गाळयांच्या खालीलप्रमाणे धोरणास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) **सदर गाळयांच्या भूईभाडयाबाबत –** सदयस्थितीत सदर गाळयांचे भूईभाडे दरमहा र.रू.५ प्रमाणे आकारण्यात येत होते .त्यात आजतागायत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

**उपाययोजना–** दरमहा गाळयांचे भाडे मिळकत वाटप नियमावली २००८ नूसार चालू बाजारभावाप्रमाणे होणारे भाडे आकारणेस,

२) **जागा हस्तांतरण शुल्क वाढीबाबत–** यापूर्वी निवासी गाळयांकरिता र.रू.१५,०००/– व व्यावसायिक गाळयांसाठी र.रू३०,०००/–फी आकारण्यात येत होती.

**उपाय योजना –** पुणे महानगरपालिकेने ९९ वर्षाच्या भाडेपट्टा कराराने दिलेल्या गाळयांची विक्री पुणे मनपाच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही. अशी अट आहे. मात्र सदयास्थितीत पुणे शहरातील जागांचे वाढलेले दर विचारात घेता सदर मिळकतीचे कोणत्याही प्रकारचे हक्क अन्य व्यक्तीच्या नावे बदलून हस्तांतरण करणेस झाल्यास त्यासाठी निवासी गाळयासाठी र.रू. ७५ हजार व व्यावसायिक गाळयांसाठी र.रू.१.५० लाख तसेच कुटूंबातील कुटूंबात(रक्तनाते) हस्तांतरण करणेसाठी र.रू.१०००/– फी आकारण्यात यावी. तथापि सदर हस्तांतरण हे फक्त नियमानूसार अधिकृत बांधकाम क्षेत्रापुरतेच मर्यादित राहील.

३) **सदर जागेवरील कर्जाबाबत–** सदर गाळेधारकांकडून जागा विकसनाची विविध बँकेकडून अर्थसहाय्य मिळणेकरिता या कार्यालयाकडील ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करणेत येत असते.

**उपाययोजना–** सदर पूनर्वसन योजनेची जागा पुणे महानगरपालिकेच्या मालकीची असल्याने तसेच संबंधित गाळाधारक हे भाडेकरू असल्याने मुख्य विधी विभागाकडील अभिप्रायानुसार मनपाच्या जागेवर कोणताही आर्थिक बोजा निर्माण न करणेकरिता संबंधितांना मनपा जागेच्या बदल्यात कोणतेही कर्ज प्रकरणे घेणेकरिता ना हरकत पत्र देणेस,

४) **अनाधिकृत बांधकामाबाबत–** सदर गाळ्यांचे वाटप करताना संबंधितांना एक एफएस आय पर्यंत बांधकाम करणेस परवानगी देणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानूसार संबंधितांनी रितसर बांधकाम विभागाकडील परवानगी घेवून बांधकाम करणे बंधनकारक होते.–

**उपाययोजना–** अनाधिकृत बांधकामाबाबत नियमानूसार जे बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय होऊ शकणार आहे अशा बांधकाम क्षेत्राबाबत रीतसर तडजोड फी आकारून सदर क्षेत्र नियामान्वित करणे. जागेवर झालेल्या अनाधिकृत बांधकाम/ओटयांचा विचार करता शुन्य दर्शनी अंतराची सवलत देता येणार नाही तसेच साईड मार्जिन्स सवलतीं बाबत पुणे महानगरपालिकेकडून निर्णय घेणे योग्य होईल.तसेच सदर ठिकाणी झालेल्या अनधिकृत बांधकामासाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे बाबतचे. धोरण मा.मुख्य सभेच्या मान्यतेने शासनाकडे मान्यतेस्तव सादर करणेस,

५) **न झालेल्या करारनाम्याबाबत–** या योजनेमध्ये अदयाप ही काही मिळकती बाबत रितसर कारारनामे करण्यात आलेले नाहीत. सदरचे करारनामे नविन दराने करून घेतल्यास मनपाच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

**उपाययोजना–** पुणे मनपा यांचेतर्फे महापालिका सहा.आयुक्त, झोनिपु, बिबवेवाडी धनकवडी परिमंडळ क्र.४ यांचेमार्फत करणे व रस्तारूंदी तत्सम विकास योजनेमध्ये बाधित झालेल्यांचे करारनामे मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत करणेस,

६) **मिळकतकराबाबत–** संबंधितांकडून मूळ गाळयांबाबत अनुज्ञेय व वाढीव बांधकाम क्षेत्रापर्यंत प्रचलित धोरणानुसार नियमित पध्दतीने कर आकारणी करणे. उर्वरीत बांधकामास मिळकत कर आकारणी विभागाकडील धोरणानूसार

७) **बेपत्ता/मयत गाळाधारकांबाबत–** मुळ गाळाधारक हयात नसेल अगर बेपत्ता (हस्तांतरण प्रक्रियेकरिता उपलब्ध नाहीत) असेल किंवा इतर वारसांबाबत कौटूंबिक वादामुळे हस्तांतरण प्रक्रिया स्थगित राहणार असेल अशावेळेस मे.न्यायालयाचे अंतिम आदेश ग्राहय धरणे. मान्य होणारी हस्तांतरण फी पुणे मनपाकडे भरल्यानंतर त्यांचेशी संक्षम प्राधिकारी झोनिपु तथा सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र.५ पुणे मनपा यांचेवतीने करार करणेस,

८) **सदर योजनेअंतर्गत हस्तांतरणास परवानगी देताना खात्याने पुणे म**.न.पा.स तोशीस लागणार नाही व सर्वसामान्य जनतेला अडचण होणार नाहीत अशा अटी–शर्ती निश्चित करण्यास.

<u>विषय क्र.४४</u>

संदर्भ – १) केंद्र शासन, आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग पत्र Z.२१०२०/१६/२०२०–PH , दि.३०/३/२०२०

२) केंद्र शासन, आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग पत्र Z–१८०१६/१/२०२०/PMGKP–NHM II, दि.३/४/२०२०

३) मा.महापौर, पुणे यांचे पत्र दिनांक ७/४/२०२०.

४. मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/कामगार कल्याण/१११ दि.४/६/२०२० चे पत्र

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२६,दि.९/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी खाली नमूद अटी व शर्तीनुसार कोरोना विषाणू (कोविड १९) प्रतिबंध व उपचार सुरक्षा कवच योजना राबविणेकामी पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. संबंधित अधिकारी/कर्मचारी हा दिवंगत होण्यापूर्वी पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाय योजनेसाठी कार्यरत असताना अथवा त्याचे कार्यक्षेत्रातील कोरोना बाधित रुग्णावर उपचार करताना थेट रुग्णाच्या संपर्कात आल्याने त्यास कोरोना विषाणूचा संसर्ग झाला असल्याचे सिद्ध होवून त्यामध्ये त्याचा मृत्यू झाल्यास सदर योजनेचा लाभ देण्यात येईल.

२. संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यास शासकीय रुग्णालय/राष्ट्रीय विषाणू संस्था/शासनमान्य खाजगी प्रयोगशाळेमध्ये तपासणी अंती कोरोना विषाणूची बाधा झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर व त्यामुळे त्याचा मृत्यू झाल्यास त्याचा वारस सदर योजनेच्या लाभास पात्र राहिल.

३. सदर अधिकारी/कर्मचारी कर्तव्यार्थ नियुक्त असताना दिवंगत झाल्याबाबत संबंधित खातेप्रमुख/ महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे प्रमाणपत्र बंधनकारक राहील.

४. या सुरक्षा कवच योजनेसाठी लागणारा निधी लाभार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात महापालिकेने कामगार कल्याण निधीस उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

५. सदर योजना कामगार कल्याण निधीचे सभासद नसलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना विशेष बाब म्हणून अनुज्ञेय राहील.

६. या योजनेंतर्गत कामगार कल्याण निधी कार्यकारी समितीने प्राप्त सर्व प्रकरणनिहाय शिफारस करुन मंजुरी द्यावयाची आहे.

७. आवश्यकतेप्रमाणे योजनेचा कालावधी, निकष व रक्कम यामध्ये बदल करण्याचे अधिकार कामगार कल्याण निधी कार्यकारी समितीस राहतील.

**<u>विषय क्र.४५</u>**

संदर्भ – १) मा.स्थानिक नगरसेविका सौ.नंदा नारायण लोणकर यांनी दि.५/५/२०२० रोजीचे मा.स्थायी समितीचे बैठकीमध्ये केलेली मागणी

२) मा.नगरसेवक श्री.गफुर पठाण व दोन कार्यकर्ते यांनी मा.महा.आयुक्त व मा.महा.आयुक्त(ज) यांच्या समवेत दि.११/५/२०२० रोजी समक्ष केलेली चर्चा

३) मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांची मान्यता ठराव क्र. ६/११० दि.२१/५/२०२०

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/११२ दि.४/६/२०२० चे पत्र.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२७,दि.९/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

Covid–१९ च्या अनुषंगाने कोंढवा खु. स.नं. १३ येथे पुणे मनपाच्या ताब्यात आलेल्या जागेमधील दफनभूमीचे काम तातडीची बाब म्हणून ठेकेदार मे.निलेश तरवडे कन्स्ट्रक्शन यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये काम करुन घेण्यास त्यासाठी त्यांचेशी करारनामा न करता व सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम भरुन न घेता सदर ठेकेदारांचे बिल अदा करणेची बाब मा.मुख्य सभेसमोर अवलोकनार्थ सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.४६</u>**

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.

२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.५/११३ दि.४/६/२०२० चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२८,दि.९/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिका झोन क्र.५ – भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत (१) सावित्रीबाई फुले शाळा ,५३१ भवानी पेठ (२) के सी ठाकरे शाळा, रास्ता पेठ (३) स.गो बर्वे शाळा, रास्ता पेठ (४) महर्षी शिंदे शाळा, घोरपडे पेठ, उद्यान शेजारी (५) क्रांतिवीर लहूजी साळवे मनपा शाळा, भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालया शेजारी येथे स्थापन केलेल्या/क्वारंटाईन सी.सी.सी. केंद्रासाठी दररोज दाखल केलेल्या नागरिकांची व्यवस्था करणेकामी गादया पुरविणे, पत्रा मांडव करणे, पत्रा पार्टीशन करणे, बाबूंचे रेलिंग करणे इ. कामे तसेच कोरोना व्हायरसने बाधित झालेल्या व रेड झोन घोषित केलेला भाग सिल करणेकामी बाबूंचे रेलिंग करणे, पत्रे लावणे व दि ०१/०६/२०२० पासून नागरीकांना जेवण पुरविणे यामध्ये दैनंदिन सकाळी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण पुरविणे इ. कामे कामाची व्याप्ती मोठ्या स्वरूपाची असल्यामूळे व सदरचे काम तातडीने करावयाचे असल्याने जाहिर निविदा न काढता ठेकेदार मे. बालाजी मंडप डेकोरेटर्स(प्रो.प्रा.कार्तिकी शेळके), या एजन्सीकडून दि.०८/०५/२०२० पासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये काम करुन घेणेस व करार करणेस तसेच याकामी दि.३१.०५.२०२० पर्यत र.रू.१२४३६९८/– व सदरचे काम संपेपर्यंत होणारी रक्कम अधिक जी.एस.टी. व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल ठेकेदारास खालीलप्रमाणे अदा करणे हि बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी - RE17F 257

Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये सदरचे कामी ठेकेदार मे. बालाजी मंडप डेकोरेटर्स (प्रो.प्रा.कार्तिकी शेळके) यांची नेमूणक करणेस व त्यानुसार त्यांचेबरोबर करार करणेस.

२) दि.८/०५/२०२० पासून ते सदरचे काम संपेपर्यंत ठेकेदार मे. बालाजी मंडप डेकोरेटर्स(प्रो.प्रा.कार्तिकी शेळके), मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेला तक्ता अ,क.ड अन्वये दि.३१.०५.२०२० पर्यत र.रू.१२४३६९८/- व सदरचे काम संपेपर्यंत होणारी रक्कम अधिक जी.एस.टी. व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल वेळोवेळी ठेकेदारास अदा करणेस

३) आजतागायत स्वयंसेवी संस्था भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयाकडे मोफत जेवण पुरवीत आहेत. सदर स्वयंसेवी संस्था दि ३१/०५/२०२० पर्यंत जेवण , नाश्ता व चहा मोफत पुरविणार आहेत. दि.०१/०६/२०२० पासून मे.बालाजी मंडप डेकोरेटर्स (कार्तिकी शेळके) तक्ता ब प्रमाणे जेवण, नाश्ता व चहा रक्कम रु.१८५/- प्रति व्यक्ती प्रति दिन याप्रमाणे पुरविणार आहेत. याप्रमाणे ठेकेदार मे.बालाजी मंडप डेकोरेटर्स यांच्या कडून रक्कम रु १८५/ प्रति व्यक्ती प्रति दिन याप्रमाणे दि.०१/०६/२०२० पासून काम करणेस.

<u>विषय क्र.४७</u>

संदर्भ - १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.५/११४ दि.४/६/२०२० चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२९,दि.९/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिका झोन क्र.५ - बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत (१) नाजुश्री मंगल कार्यालय, बिबवेवाडी (२) अण्णाभाऊ साठे सांस्कुतिक केंद्र, बिबवेवाडी (३) अग्निशामक केंद्र, गंगाधाम चौक, बिबवेवाडी (४) तालेरा गार्डन सांस्कुतिक हॉल, मार्केटयार्ड, गुलटेकडी (५) शिवशंकर सभागृह, मुकुंदनगर (६) शाही शहनाई हॉल, महर्षीनगर (७) जानकी हॉल, स्वारगेट येथे स्थापन केलेल्या/क्वारंटाईन सी.सी.सी. केंद्रासाठी दररोज दाखल केलेल्या नागरिकांची व्यवस्था करणेकामी गादया पुरविणे, पाण्याच्या टाक्या पुरविणे, पत्रा मांडव करणे, पत्रा पार्टीशन करणे, बाबूंचे रेलिंग करणे इ. कामे तसेच कोरोना व्हायरसने बाधित झालेल्या व रेड झोन घोषित केलेला भाग सिल करणेकामी बाबूंचे रेलिंग करणे, पत्रे लावणे व नागरीकांना जेवण पुरविणे यामध्ये दैनंदिन सकाळी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण पुरविणे इ. कामे कामाची व्याप्ती मोठ्या स्वरूपाची असल्यामूळे व सदरचे काम तातडीने करावयाचे असल्याने जाहिर निविदा न काढता ठेकेदार मे.शंकरबाबा एंटरप्रायजेस (प्रो.प्रा.सचिन शिवराज औरादे), श्री.नैमोद्दीन वलयात तांबोळी व श्री. धनंजय महेंद्र काकडे या एजन्सीकडून दि.३०/०४/२०२० पासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये काम करुन घेणेस व करार करणेस तसेच याकामी दि.१९.०५.२०२० पर्यत र.रू.१७,३६,१९०.२५ व सदरचे काम संपेपर्यंत होणारी रक्कम अधिक जी.एस.टी. व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल ठेकेदारास अदा करणेस व खालील बाबी मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी - RE17F 257

कोविड-१९ अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये सदरचे कामी ठेकेदार मे.शंकरबाबा एंटरप्रायजेस (प्रो.प्रा.सचिन शिवराज औरादे) श्री.नैमोद्दीन वलयात तांबोळी व श्री. धनंजय महेंद्र काकडे यांची नेमूणक करणेस व त्यानुसार त्यांचेबरोबर करार करणेस.

२) दि.३०/०४/२०२० पासून ठेकेदार मे.शंकरबाबा एंटरप्रायजेस (प्रो.प्रा.सचिन शिवराज औरादे), श्री.नैमोद्दीन वलयात तांबोळी व श्री. धनंजय महेंद्र काकडे यांचे याकामी दि.१९.०५.२०२० पर्यत र.रू. १७,३६,१९०.२५ व सदरचे काम संपेपर्यंत होणारी रक्कम अधिक जी.एस.टी. व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल वेळोवेळी ठेकेदारास अदा करणेस

३) जेवणाकरिता मुख्य खात्यामार्फत निविदा मान्य झाल्यापासून निविदा मान्य दराने काम करुन घेण्याची खात्याकडून दक्षता घेणेत येईल.

**विषय क्र.४८**

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.५/११५ दि.४/६/२०२० चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३०,दि.९/६/२०२०

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिकेच्या उपायुक्त झोन क्र.५ अंतर्गत कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामध्ये (१) गणेश कला क्रीडा रंगमंच, स्वारगेट (२) रावसाहेब पटवर्धन विद्यालय, सिंहगड रोड, पर्वती ३) बाबुराव सणस कन्या शाळा, मंगळवार पेठ ४) न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड या ठिकाणी गादया पुरविणे, पत्रा पार्टिशन करणे, दैनंदिन दोन वेळा चहा नाश्त्यासह लहान मुलांकरिता दुध व बिस्कीट व भोजन व्यवस्था,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इ. कामे करण्यात आलेली आहेत.तसेच प्रभाग क्र.१६ व २९ मधील कोरोना बाधित वस्त्या (हॉट स्पॉट) सील करणेसाठी पत्रा पार्टिशन देखील करण्यात आलेले आहे. या प्रमाणे झालेल्या कामाची व्याप्ती मोठ्या स्वरूपाची असल्यामुळे व सदरचे काम तातडीने करावयाचे असल्याने जाहीर निविदा न मागवता मे. शंकर बाबा महाराज व मे. सामर्थ्य प्रबोधिनी यांचे मार्फत सदरील सर्व कामे सुरु केलेली आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये कोरोना विषाणू संसर्गाच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आपत्कालीन परीस्थितीमध्ये तातडीने खुल्या बाजारामधून आवश्यक व गरजेच्या गोष्टी उपलब्ध करुन घेणेची खालील बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक
महसुली कामांसाठी – RE17F 257
Covid–19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये सदरचे कामी ठेकेदार मे. शंकर बाबा एन्टरप्रा याजेस (प्रो.प्रा. सचिन शिवराज औरादे), व मे. सामर्थ्य प्रबोधिनी यांची नेमणूक केलेली आहे. व त्यानुसार त्यांचेबरोबर करार करून काम करून घेण्यात येत आहे..

२) दि. ०९/०५/२०२० पासून ते सदरचे कामा संपेपर्यत ठेकेदार मे. शंकर बाबा एन्टरप्रा याजेस (प्रो.प्रा. सचिन शिवराज औरादे), व मे. सामर्थ्य प्रबोधिनी यांचे या कामी दि. २०/०५/२०२० पर्यत रं.रु. १०,९४,२३७.०० व सदरचे काम संपेपर्यत रक्कम अधिक जी.एस.टी अधिक कर याप्रमाणे होणा-या कामाचे बिल वेळोवेळी अदा करण्यात येत आहे.

३) जेवणाकरिता मुख्य खात्यामार्फत निविदा मान्य झाल्यापासून निविदा मान्य दराने काम करुन घेण्याची खात्याकडून दक्षता घेणेत येईल.

**विषय क्र.४९**

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२) मुख्य लेखा व वित्त विभागाकडील जा.क्र. १८७ दि.२९/४/२०२० चे कार्यालयीन परिपत्रक.
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/११९ दि.५/६/२०२० चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३३,दि.९/६/२०२०

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिका शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणाऱ्या क्वारंटाईन/ आयसोलेशन/ सीसीसी केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना व त्या केंद्रावर तीन पाळी मध्ये काम करणाऱ्या म.न.पा. सेवकांना दैनंदिन सकाळी चहा+नाष्टा, दुपारचे व रात्रीचे जेवण पुरविणे हे काम मोठया स्वरुपाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न काढता मे.कावेरी एंटरप्रायजेस यांचेकडून सुरु करण्यात आलेले असून त्याबाबत खालील बाबीस मान्यता देणेस तसेच खालील बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणाऱ्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद तक्त्याप्रमाणे क्वारंटाईन/आयसोलेशन/सीसीसी केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना व त्या केंद्रावर तीन पाळी मध्ये काम करणाऱ्या म.न.पा. सेवकांना दैनंदिन सकाळी चहा+नाष्टा, दुपारचे व रात्रीचे जेवण मे.कावेरी एंटरप्रायजेस यांचेकडून र.रु. २०५/- (प्रतिदिनी प्रति व्यक्ती+जीएसटी व अन्य कर) देणेस तसेच झालेल्या जेवणाचे दि.२७/४/२०२० पासूनचे बिल खालील अर्थशिर्षकामधून आदा करणेस मुख्य लेखा व वित्त विभागाकडील जा.क्र. १८७ दि.२९/४/२०२० चे कार्यालयीन परिपत्रकानुसार क्वारंटाईन/आयसोलेशन/सीसीसी केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना जेवण पुरविणेसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रकातील १. महसुल कामासाठी- RE17F257

२) मे.कावेरी एंटरप्रायजेस यांचेशी करार करणेस

३) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार दि.२७/५/२०२० पासून करणेस तसेच मुख्य खात्यामार्फत निविदा मान्य झाल्यावर, निविदा मान्य दरानी निविदा मान्य झाल्यापासून काम करणे बंधनकारक राहील.

<u>विषय क्र.५०</u>

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.४/१२० दि.५/६/२०२० चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३४,दि.९/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत १) एस.एम.जोशी महाविद्यालय, वस्तीगृह, हडपसर, पुणे २८ २) महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे- दादा गुजर माध्यमिक विद्यालय, तरवडे वस्ती, महंमदवाडी ३) कै.रामचंद्र (अप्पा) बनकर इंग्लिश मिडीयम स्कूल (मनपा शाळा), गोंधळेनगर ४) ससाणे एज्युकेशन सोसायटीचे-न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल, ससाणेनगर, हडपसर, पुणे २८ येथे स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना व त्या केंद्रावर तीन पाळी मध्ये काम करणाऱ्या म.न.पा. सेवकांना दैनंदिन सकाळी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण देणेबाबत हे काम मोठया स्वरुपाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न काढता मे.न्यू स्टार केटरर्स प्रो.आशा संतोष थामी, स.नं. ५५ भाग्योदयनगर, कोंढवा खु., पुणे ४८ यांचेकडून र.रु. २०५/- प्रतिदिनी प्रति व्यक्ती + जी.एस.टी. व अन्य कर देणेस तसेच झालेल्या कामाचे दि.२/५/२०२० पासून बिल खालील अर्थशिर्षकामधून आदा करणेस व खालील बाबी मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी - RE17F 257

Covid – 19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

१) मे.न्यू स्टार केटरर्स प्रो.आशा संतोष थामी यांनी सादर केलेल्या र.रु. २०५/- प्रतिदिन या दराने जेवण पुरवठा करणेसाठी त्यांची नेमणूक करणेस व त्यानुसार त्यांच्याशी करार करणेस

२) त्यानुसार मे.न्यू स्टार केटरर्स प्रो.आशा संतोष थामी यांचे होणारे बिल वेळोवेळी अदा करणेस

३) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार दि.२/५/२०२० पासून सदरचे काम संपेपर्यंत करणेस

४) तसेच अतिक्रमण विभाग, पुणे महानगरपालिका या विभागाकडून पुणे शहरासाठी एकत्रित जेवणे पुरविणेसाठीची कार्यवाही सुरु असून त्यामध्ये र.रु. १८५/– प्रतिदिन या दरास मा.स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी देखील र.रु. १८५/– प्रतिदिन या दराने पुरवठा करणेस मे.न्यू स्टार केटरर्स प्रो.आशा संतोष थामी हे तयार असल्यास पुरवठा करुन घेणेस अन्यथा तयार नसल्यास त्यांच्याशी केलेला करार संपुष्टात आणणेस

विषय क्र.५१

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड-१९ उपयायोजना नियम-२०२०
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) मा. महापालिका आयुक्त कार्यालयाकडील जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था/९९१६, दि.३०/३/२०२० चे कार्यालयीन आदेश.
५) अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांचे कार्यालय सेंट्रल बिल्डिंग अ बॅरेक यांचे पत्र.
६) महापालिका आयुक्त कार्यालय ठराव क्र.६/३३,दि.२०/०४/२०२०.
७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/१२१ दि.५/६/२०२० चे पत्र.
८) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३५,दि.९/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भाव –लॉकडाउन कालावधीत बेघर, विस्थापित कामगार, परराज्यातील अडकलेले कामगार यांच्यासाठी शिजविलेले अन्न व्यवस्थेबाबत कम्युनिटी किचन सुरु करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अंतर्गत नियुक्त केलेल्या सेंट्रल किचनमार्फत मा.महा.आयुक्त यांचे विषयत्रात नमुद केलेले काम करण्यासाठी अंदाजे र.रु.२.०४ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरची बाब मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

विषय क्र.५२

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/१२२ दि.५/६/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३६,दि.९/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र. २ अंतर्गत औंध–बाणेर क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यकक्षेत स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/CCC केंद्रामध्ये दररोज दाखल होणाऱ्या रुग्ण व कार्यरत सेवकांना दैनंदिन सकाळी चहा, नाष्टा, दुपारचे व सायंकाळचे जेवण, पिण्याचे पाणी व इतर साहित्य पुरविणे इ. कामे हे काम मोठया स्वरुपाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न मागविता मे.ए.पी.हॉस्पिटॅलिटी ॲण्ड सर्व्हिसेस व मे.शारदा केटरर्स या एजन्सीकडून करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता देणेस तसेच सदर बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) परिमंडळ क्र. २ अंतर्गत औंध–बाणेर क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यकक्षेत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद ठिकाणच्या स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/CCC केंद्रात दररोज दाखल होणाऱ्या रुग्ण व कार्यरत सेवकांना दैनंदिन सकाळी चहा, नाष्टा, दुपारचे व सायंकाळचे जेवण मे.ए.पी.हॉस्पिटॅलिटी ॲण्ड सर्व्हिसेस व मे.शारदा केटरर्स यांचेकडून र.रु. २००/– (सर्व प्रकारचे करांसह) प्रतिदिन प्रति व्यक्ती या दराने दि.१/४/२०२० पासून करुन घेतलेल्या कामाचे बिल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये मा.महापालिका आयुक्त यांचे अधिकारात करारनामा न करता खालील नमुद अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस

सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक

मुख्य देखरेख वसुली वगैरे, थ आपत्ती व्यवस्थापन विभाग,

थ १. नैसर्गिक आपत्तीग्रस्त/अपघातग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत RE11R101

२) वरील अ.क्र. १ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार दि.१/४/२०२० पासून ते सदरचे काम संपेपर्यंत करणेसाठी औंध–बाणेर क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यकक्षेत प्रभाग क्र. ८ व ९ मधील काही मनपा शाळा, मंगल कार्यालये व ज्येष्ठ नागरिक संघाचे हॉल याठिकाणी अवेटेड व निगेटिव्ह रुग्णांसाठी व कार्यरत सेवकांकरीता आवश्यकतेनुसार सदरच्या पुरवठादाराकडून प्रतिदिन प्रतिव्यक्ती (सर्व प्रकारचे करांसह) र.रु. २००/– या मान्य दरानुसार चहा, नाष्टा, जेवणे पुरविणेस, त्याप्रित्यर्थचे बिल वेळोवेळी अदा करण्यास, तसेच सदर कामी मुख्य खात्याने राबविलेल्या निविदेमध्ये जो दर येईल त्या दरानुसार मान्यता दिनांकापासून पुढील देयके आदा करणेस

३) मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेसमोर सादर केलेल्या कार्यवाहीस व खर्चास कार्योत्तर मान्यता तसेच यापुढे होणाऱ्या खर्चास मान्यता देणेस.

<u>विषय क्र.५३</u>

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३/०३/२०२०.

२) महाराष्ट्र कोविड-१९ उपयायोजना नियम-२०२०

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

४) मा. महापालिका आयुक्त कार्यालयाकडील जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था/९९१६, दि.३०/३/२०२० चे कार्यालयीन आदेश.

५)अन्नामृत फाउंडेशन (Annamrita Foundation,इस्कॉन) यांचे दि.२१/०५/२०२० रोजीचे पत्र.

६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/१२३ दि.५/६/२०२० चे पत्र.

७) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३७,दि.९/६/२०२०

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भाव – लॉकडाउन कालावधीत बेघर,विस्थापित कामगार, परराज्यातील अडकलेले कामगार यांच्यासाठी labour shelter,वस्ती पातळीवर व विस्थापित नागरिकांसाठी प्रतिदिन दोन वेळचे जेवण तयार करून पॅकिंग करून पुरवठा करणे शिजविलेले अन्न पुरवठा करणेबाबत अन्नामृत फाउंडेशन (Annamrita Foundation, इस्कॉन) यांनी कळविलेल्या ४५/- (प्रती जेवणप्रमाणे) हा दर प्राप्त निविदादरापेक्षा कमी असल्याने त्यांचेकडून दोन वेळचे जेवण तयार करणे,व पुरवठा करणे सोयीचे होईल. सदर दरानुसार एकूण ५००० नग दोन वेळा प्रतिदिन प्रमाणे ३० दिवसांकरिता रक्कम रुपये १ कोटी ३५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अंतर्गत उपरोक्त काम तातडीने करावयाचे असल्याने अन्नामृत फाउंडेशन (Annamrita Foundation, इस्कॉन) कडून प्राप्त दरांनुसार (र.रु. ४५/-प्रति जेवण) या दराने मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद ठिकाणी अन्नपुरवठा करण्यात येत आहे.

सदरची बाब मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

<u>विषय क्र.५४</u>

संदर्भ – १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/२७९, दि.२३/८/२०१९ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१७२ दि.१६/९/२०१९

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४३,दि.१६/६/२०२०

विषय – पुणे पेठ शुक्रवार फा. प्लॉट क्र. ३८/ड सारसबागेसमोरील नवलोबा मंदिराशेजारील वाहनतळ ३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणेबाबत

––––

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ शुक्रवार फा. प्लॉट क्र. ३८/ड सारसबागेसमोरील नवलोबा मंदिराशेजारील वाहनतळ ३

वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देण्यासाठी निविदा मागविल्या असता आलेल्या तीन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र.१ चे निविदाधारक श्री गणेश एकनाथ कासार, पत्ता ३२/अ, कैलास भुवन मागे, स्वारगेट, पर्वती,पुणे-४११००१ यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ९,३०,२००/- ( अक्षरी रक्कम रू. नऊ लाख तीस हजार दोनशे फक्त ) ही मनपा निर्धारीत वार्षिक रक्कम रूपये ४,५९,९००/-( अक्षरी रक्कम रू.चार लाख एकोणसाठ हजार नऊशे फक्त) पेक्षा रक्कम रूपये ४,७०,३००/- (अक्षरी रक्कम रू.चार लाख सत्तर हजार तीनशे फक्त) ने जास्त असल्याने त्यांच्याकडून ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर त्यांना देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर आयकर व वस्तु आणि सेवा कर भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ आणि मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.५५**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१०९९,दि. १३/२/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २९२ दि.२८/२/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४४,दि.१६/६/२०२०

विषय – पुणे पेठ औंध स.नं.१५२+१५३ येथील महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन मधील कार्यालयीन गाळे अन्न व औषध प्रशासन, पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य कार्यालयास भाडे तत्वावर देणेबाबत

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व शिफारस विचारात घेऊन...

विषयांकित गाळे मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालयाकडील इकडील जा.क्र.९८७२ दि.१६/३/२०१९ व १९२३ दि.१८/६/२०१९ रोजीचे पत्रान्वये अन्न व औषध प्रशासन, पुणे विभाग यांना पुन्हा भाडे थकबाकी भरणेबाबत कळविण्यात आले.त्यानुसार सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन, पुणे विभाग यांचे इकडील आ.क्र.१४२८ दि.२२/५/२०१९ व २३८७ दि.१९/०६/२०१९ रोजीचे पत्रान्वये अन्न व औषध प्रशासन, पुणे विभाग यांनी शासनाकडे थकीत भाडे पुणे मनपास प्रदान करणेकरिता अनुदान उपलब्ध होणेबाबत व ५ वर्षाचा भाडेकरार करणेबाबत अनुमती मागितलेली आहे. सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन, पुणे विभाग यांचे मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालयाकडील आ.क्र.७१६४ दि.२७/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये अन्न व औषध प्रशासन, पुणे विभाग यांनी शासनाकडून प्राप्त पत्रान्वये पुणे मनपास द्यावयाच्या भाडयाबाबत प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध होणेबाबत अन्न व औषध प्रशासन, पुणे विभाग यांना प्रस्ताव सादर करणेबाबत कळविलेले असल्याचे नमूद केलेले आहे.

१. ताबेयादीनुसार भाडेकरारनामा दि.१/११/२०१५ पासून ११ महिने कालावधीकरिता करणेत आलेला असला तरी प्रत्यक्ष स्थलांतर हे दि.१/४/२०१६ रोजी करणेत आले असल्याने सदरचा भाडेकरारनामा दि.१/४/२०१६ पासून करणेस
२. दि.१/११/२०१५ ते दि.३१/३/२०१६ असे ५ महिन्यांचे दरमहा भाडे र.रू.१,३५,७५३/- प्रमाणे ५ महिने X र.रू.१,३५,७५३/- असे एकूण र.रु. ६,७८,७६५/ = इतके भाडे माफ करणेस
३. औंध येथील महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवनामधील पाचव्या मजल्यावरील गाळे क्र.५०१ ते ५०६ हे दि.१/४/२०१६ ते दि.३१/३/२०२२ असे ६ वर्ष मुदतीकरिता दरमहा भाडे र.रू. १,३५,७५३/- प्रमाणे दर ३ वर्षांनी १२ % भाडेवाढ करून वरीलप्रमाणे अन्न व औषध प्रशासन पुणे विभाग यांना देणेस व त्यांचेसोबत करारनामा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.५६**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/९५४,दि. १४/१/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २९९ दि.२८/२/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४५,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

मे.बॉश चासीस सिस्टीम इंडिया प्रा.लि. पुणे महानगरपालिका क्षेत्रात शैक्षणिक कामे करणार आहेत. त्याचा फायदा मनपा हद्दीतील नागरिकांना होणार आहे. त्यामुळे सदरचा संयुक्त प्रकल्प समजून तसेच जागेवर करणेत येणाऱ्या कामाचा संपूर्ण खर्च मे. बॉश चासीस सिस्टीम इंडिया प्रा.लि. त्यांच्या C.S.R. फंडातून

करणार असल्याने मे.बॉश चासीस सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांचेकडून सार्वभौमतीक पोटी दरवर्षी एक रूपया आकारून तसा करारनामा करणेस व खालील अटींवर जागेवर कामे करणेसाठी देखभाल दुरूस्ती करणेकरीता देण्यासाठी खालील बाबींस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. सदरची इंद्रप्रस्थ उदयान, येरवडा येथील जागेची मालकी पुणे महानगरपालिकेची असेल
२. जागेवर ट्रॅफिक एज्युकेशन पार्क विकसन करण्याचा संपूर्ण खर्च मे. बॉश चासीस सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांनी करावा
३. सदरच्या उदयानामध्ये निर्माण कालावधी तसेच पूर्ण झाल्यानंतरच्या कालावधीमध्ये पुणे मनपाचे अधिकृत प्रतिनिधी त्यांचे आवश्यकतेनुसार सर्वेक्षण तथा आवश्यक ती कामे करणेकरिता त्यांना मे. बॉश चासीस सिस्टीम इंडिया प्रा.लि. कंपनी यांच्या परवानगीची अथवा नाहरकत पत्राची आवश्यकता राहणार नाही.
४. सदर प्रकल्पाचा लाभ नागरिकांना मोफत अथवा वाजवी शुल्क आकारून देणेचा निर्णय मा. महापालिका आयुक्त यांना असावा. येथील जाहिरातीचे उत्पन्नाबाबत मा. महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.
५. विकसित जागेच्या दैनंदिन व दुरूस्ती खर्च ५ वर्षापर्यंत मे.बॉश चासीस सिस्टीम इंडिया प्रा.लि. मार्फत करण्यात यावा या कामी मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता बंधनकारक राहील.
६. सदर ठिकाणी कामे करताना जागा वापरासंदर्भात बांधकाम विकास विभागाचे व उद्यान,ट्रॅफिक इत्यादी संबंधित विभागांचे अभिप्राय घेणे बंधनकारक राहील.
७. सदरची मिळकत पुणे मनपाचे मान्यते व्यतिरिक्त इतर कोणत्याही संस्थेस परस्पर हस्तांतरित करता येणार नाही
८. सदरच्या प्रकल्पीय कामाचे सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी मे.बॉश चासीस सिस्टीम इंडिया प्रा.लि. कंपनी यांची राहील.सदरच्या कालावधीमध्ये कोणतीही दुर्घटना घडल्यास अथवा आर्थिक नुकसान झाल्यास त्याची कोणतीही तोशिष पुणे महानगरपालिकेस लागू देणार नाही.
९. ५ वर्षाची मुदत संपल्यावर संबंधित मे.बॉश चासीस सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांनी सदर विकसित जागेचा विनाअट ताबा पुणे महानगरपालिकेस देणे बंधनकारक राहील
१०. सदर विकसित जागेसंदर्भात जरूर ते संपूर्ण निर्णय घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहील

**<u>विषय क्र.५७</u>**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मा.व्य/१३०३,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २० दि.१६/६/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४६,दि.१६/६/२०२०

––––

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे हडपसर घरांक ८०,८१,८४,२४३+२४४,२४६ मनपा उर्दु शाळा क्र.६२ येथील बहूविकलांग मुलांचे शाळेतील तीसऱ्या मजल्यावरील ४ वर्ग खोल्या ताबा दिनांकापासून ३ वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर चालविणेस देणेबाबत. निविदा मागविली असता आलेल्या २ निविदापैकी निविदेतील क्र१ चे निविदाधारक युनिव्हर्सल सोशल डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च फौंडेशन पत्ता–१४६८,सदाशिवपेठ,पुणे ४११०३० यांनी देऊ केलेली मासिक र.रु.१७,५००/–(अक्षरी र.रु.सतरा हजार पाचशे फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक र.रु.१३,३७६/–(अक्षरी र.रु.तेरा हजार तिनशे शहात्तर फक्त) पेक्षा र.रु.४,१२४/–(अक्षरी र.रु.चार हजार एकशे चोविस फक्त) ने जास्त आहे. त्याप्रमाणे आणि शासकीय नियमानुसार प्रतिमहा मक्ता रकमेवर सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पध्दतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ आणि मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र.५८</u>**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मा.व्य/६०,दि.१३/५/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २१ दि.१६/६/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४७,दि.१६/६/२०२०

––––

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे पेठ धनकवडी स.नं.१९/४अ, ट्रक टर्मिनल येथील दक्षिणेकडील जागा सी.एन.जी.पंप सुरु करणेसाठी ३० वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणे कामी निविदा मागविली असता आलेल्या २ निविदापैकी सर्वात जास्त दर देणारे निविदाधारक मे.गणेश एन्टरप्रायझेस तर्फे श्री.गणेश पासिलकर पत्ता–मु.पो.घाटाव,ता.रोहा जि.रायगड यांनी देऊ केलेली ३० वर्षे कालावधीची र.रु.१,५८,००,०००/–(अक्षरी र.रु.एक कोटी आठावन्न लाख फक्त) ही मनपा निर्धारीत ३०वर्षे कालावधीची र.रु.१,५७,३२,०००/–(अक्षरी र.रु.एक कोटी सतावन्न लाख बत्तीस हजार फक्त) पेक्षा र.रु.६८,०००/–(अक्षरी र.रु.अडुसष्ट हजार फक्त) ने जास्त असल्याने त्यांची निविदा स्विकारून ताबा दिनांकापासून ३० वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्ती प्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेस तसेच शासकिय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर आयकर व वस्तु आणि सेवाकर भरून घेणेस तसेच स्वामित्वापोटी दरवर्षी र.रु.१/– नाममात्र भाडे भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.५९**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मा.व्य./१२९ दि.१५/६/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४८,दि.१६/६/२०२०

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

कोविड – १९ रुग्णालयातील/स्वॅब कलेक्शन सेंटर येथे कार्यरत वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांचे निवासीची व्यवस्था करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार खास बाब म्हणून मान्यता देण्यात आलेली असून खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे हॉटेलमधील निवासाच्या होणाऱ्या खर्चास व त्यानुसार हॉटेल्सची देयके आदा करणेस
२) कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव आटोक्यात येईपर्यंत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचा हॉटेलमधील निवासाचा कालावधी, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची हॉटेलमधील संख्या व हॉटेल्सची संख्या आवश्यकतेनुसार वाढविणेस

**विषय क्र.६०**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१३२ दि.१६/६/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४९,दि.१६/६/२०२०

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

कोरोना (Covid-19) या साथीच्या रोगाच्या नियंत्रणाकरिता सन २०२०–२१ च्या अर्थसंकल्पामध्ये अर्थशिर्षक तरतूद वर्गीकरणाव्दारे उपलब्ध करुन देणेसाठी सन २०२०–२१ या आर्थिक वर्षातील भांडवली कामांसाठी केलेल्या तरतूदीतून झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन निधी, मागासवर्गीय कल्याणकारी योजना निधी, महिलाबाल कल्याण योजना निधी, युवक कल्याणकारी योजना निधी, दिव्यांग कल्याणकारी योजना निधी, पुणे जिल्हा नियोजन व विकास मंडळ व क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची कामे साठी केलेल्या तरतूदी वजा जाता शिल्लक राहिलेल्या तरतूदीच्या १०% सरसकट कपात करुन कोरोना (Covid-19)ग्रस्तांवर करावयाच्या उपाययोजनेच्या खर्चाकरिता वर्गीकरणाव्दारे उपलब्ध करुन घेणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांना अधिकार देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.६१**

संदर्भ – १) शासन निर्णय क्र. कोरोना–२०२०/प्र.क्र.१७३/आरोग्य–५ दि. २२/६/२०२०
२) शासन परिपत्रक वित्त विभाग संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५९/२०/कोषा.प्रशा–५ दि.१८/३/२०२०
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१३९ दि. २३/६/२०२० चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६५,दि.२३/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

कोरोना कोव्हिड १९ रूग्णांकरीता Standard Q COVID-19 Ag Kit SD Biosensor यांचेकडून र. रू. ४,५०,००,०००/- ( अक्षरी रक्कम रूपये चार कोटी पन्नास लाख फक्त ) + जीएसटी या दरानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) अन्वये खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस, खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE 17F 257
COVID-19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च

**मा.शहर सुधारणा समितीचे ठराव**

विषय क्र.६२

संदर्भ - १) मे.औदयोगिक अधिकारी (ULC) औदयोगिक आयुक्त यांचे पत्र जा.क्र. ULC/४०१८, दि.१७/९/१९७७
२) मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर करणेत आलेले पत्र जा.क्र. शआजा/ज/१२६०९ दि.१५/११/२०१८
३) मे.महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ शासन निर्णय क्रमांक-टीपीएस-१८१९/१६०७/प्र.क्र.१६६/१९/नवि-१३, दि. १८/९/२०१९
४) कमिन्स इंडिया लि. यांचे दि.१४/१०/२०१९ रोजीचे पत्र
५) या विभागाचे मा.सह संचालक नगर रचना विभाग पुणे यांना जा.क्र. शअजा/ज/१२०२२ दि.६/११/२०१९ अन्वये आक्षेप पत्र
६) मा.सहाय्यक संचालक, नगर रचना, पुणे विभाग यांचे क्र. २०६६ दि.१६/११/२०१९ व जा.क्र. ५२ दि.८/१/२०२०अन्वयेचे पत्र.
७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/११६१ दि.२/३/२०२० चे पत्र.
८) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.७,दि.१२/६/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे मौजे कोथरुड स.नं. ४२ ते ४५ कमिन्स इंडिया लि. येथील EWS-९ आरक्षण मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१क क)(क) अन्वये फेर बदलास पुणे महानगरपालिकेचे खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

१) सदर मिळकतीबाबत नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमानुसार सदर EWS-9 आरक्षणाची जागा पुणे मनपास विना मोबदला ताब्यात मिळणे आवश्यक आहे.
२) सदर मिळकतीचे मंजूर लेआऊट नुसार EWS-9 आरक्षणाची जागा रस्ताभिमुख असून सर्व पायाभुत सोईसुविधा सदर मिळकतीस उपलब्ध असल्याने सदर आरक्षण त्याच ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी विकसित होणे आवश्यक आहे.
३) मे.कमिन्स इंडिया लि. यांनी संदर्भ क्र. ५ चे पत्रासोबत उंड्री येथील मिळकतीचे मुल्यांकन जोडले आहे त्यानुसार स.नं. २७ मधील जागेचे मुल्यांकन र.रु. १४.१६ कोटी व स.नं. २३ मधील जागेचे मुल्यांकन र.रु.१३.९६ कोटी होत आहे. तथापि कोथरुड येथील मुळ आरक्षित मिळकतीचे मुल्यांकन र.रु.१४६.१४ कोटी होत आहे. म्हणजेचे उंड्री येथील क्षेत्र पुणे मनपास दिल्यास पुणे मनपाचे खुप मोठे नुकसान होणार आहे. तरी सदर आरक्षणासाठी पुणे मनपास कोथरुड येथील जागा मिळणेस विनंती आहे.

त्याप्रमाणे शासनास कळविणे गरजेचे आहे. या कार्यवाहीचा भाग म्हणून पुणे महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेचे मत व प्राप्त हरकती अर्जावरील पुणे महानगरपालिकेचे मत व अभिप्राय मा.नियुक्त अधिकारी तथा उप संचालक, नगर रचना, पुणे विभाग यांजकडे सादर करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.६३**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२८७,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.९,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| अ. क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डीआसी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ. मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे, म. कर्वेनगर,स.नं १३/१/५ हिंगणे ब्रु.सि.स.नं.५००, ५०१ (पैकी) | ३०मी.डी.पी.रस्त्याने (३६ मी.डि.पी. रस्ता दि.५/१/२०१७ रोजीच्या मान्य विकास आराखड्यानुसार) | १)श्री.स्वप्निल देवराम दुधाने २)श्री.इंद्रजित हनुमंत जाधव | विरळ वस्ती | १८६.०० चौ. मी. | (विनामोबदला २.०४चौ.मी. क्षेत्र वजा जाता) १८३.९६चौ.मीX२.००=३६७.९२ चौ.मी. | ००५४८९ | मार्च २०२० |

**विषय क्र.६४**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२८८,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| **अ .क्र** | **मिळकतीचा तपशील** | **आरक्षणाचा प्रकार** | **डीआसी होल्डरचे नाव** | **टिडी आर झोन** | **७/१२ नुसार झोन** | **टिडीआर देय क्षेत्र चौ. मी.** | **डीआरसी क्र.** | **डीआरसी दिल्याचा महिना** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे, महर्षी कर्वेनगर,स.नं १३/१/१ (पैकी) हिंगणे बुद्रुक.सि.स.नं. ५०१(पैकी) | ३६मी. डि.पी. रस्ता | मेट्रो डेव्हलपर्स तर्फे सचिन सुमतीलाल लोढा, आनंद अशोक नहार | विरळ वस्ती | ३५३.७६ चौ. मी. | ३५३.७६चौ.मी X२.१०=७४२.८९ चौ.मी. | ००५७५६ | मार्च २०२० |

**विषय क्र.६५**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२८९,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| अ. क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डीआसी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ. मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे, वारजे ११४/१ (पैकी) | २४ मी. डि.पी. रस्ता | फ्लॅगशीप व्हेंचर्स तर्फे भागीदार श्री.श्रेयांस बंब | विरळ वस्ती | २००.०० चौ. मी. | २००.००चौ.मी X२.१०= ४२०.०० चौ.मी. | ००५७४१ | मार्च २०२० |

**विषय क्र.६६**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२९०,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| अ.क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डीआसी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ. मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे, आंबेगाव बु.स.नं. २८/१८ (पैकी) | १२ मी. डि.पी. रस्ता | १)पुष्पा बापु भणगे<br>२)बापु गुलाब भणगे | विरळ वस्ती | २४८.०० चौ. मी. | २४७.९१चौ.मी X२.००= ४९५.८२ चौ.मी. | ००५५०८ | मार्च २०२० |

**विषय क्र.६७**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२९२,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| अ.क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डीआसी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ. मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे, हडपसर स.नं.४८, फ्लॅट नं.४(पैकी) | १२ मी. डि.पी. रस्ता आणि १८ मी. डि.पी. | असिफ मोहम्मद इकबाल, अरिफ मोहम्मद इकबाल, अबिद मोहम्मद इकबाल, हमीदा मोहम्मद इकबाल, | विरळ वस्ती | ९७१.८८ चौ. मी. | ९७१.८८ चौ.मी.X २.२० = २१३८.१३ चौ.मी.<br>१०६९.०७ चौ.मी.<br>१०६९.०६ चौ.मी. | ००५७५०<br>००५७५१ | मार्च २०२० |

**विषय क्र.६८**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२९३,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| अ क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डीआसी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ. मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा हिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे, हडपसर स.नं.४८, फ्लॉट नं. २ (पैकी) | गार्डन (जी–१८) | असिफ मोहम्मद इकबाल, अरिफ मोहम्मद इकबाल, अबिद मोहम्मद इकबाल, हमीदा मोहम्मद इकबाल, | विरळ वस्ती | १८८६.३९ चौ. मी. | १८८६.३९ चौ.मी. X २.२० = ४१५०.०५ चौ.मी.<br>१०००.०० चौ.मी.<br>१०७५.०० चौ.मी.<br>१०७५.०० चौ.मी.<br>१०००.०५ चौ.मी. | ००५७५२<br>००५७५३<br>००५७५४<br>००५७५५ | मार्च २०२० |

**विषय क्र.६९**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२९४,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१५,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| अ.क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डीआसी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ. मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे, वडगांव बुद्रुक.स.नं. ११/२ (पैकी) | ३० मी. डि.पी. रस्ता | मे.अमेय बिल्डर्स तर्फे भागीदार १)मनिषा केदार फाटक २)सुनिता उत्तमकुमार पवार ३)दिपक भिमराव पाटील | विरळ वस्ती | ४१४.२८ चौ. मी. | ४१४.००चौ.मी X२.२०= ९१०.८ चौ.मी. | ००५७०० | मार्च २०२० |

**विषय क्र.७०**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२९५,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१६,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| अ | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डीआसी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ. मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे, कात्रज स.नं. ५३/१ (जुना स.नं. १४७/१) येथील | ६० मी. डि. पी. रस्ता आणि अनबिल्डेबल क्षेत्र | श्री.राजेंद्र रामदास वाळुंज श्री.उल्हास रामदास वाळुंज | विरळ वस्ती | १९००.०० चौ. मी. | १९००.००चौ.मी X २.२०= ४१८०.०० चौ.मी. क्षेत्रापैकी १०००.०० चौ.मी. प्रमाणे एकूण ३ डिआरसी प्रमाणपत्रे तर ११८० चौ.मी. क्षेत्राचे १ डिआरसी प्रमाणपत्र १०००.००चौ.मी. १०००.००चौ.मी. १०००.००चौ.मी. ११८०.००चौ.मी. | ००५७३७ ००५७३८ ००५७३९ ००५७४० | मार्च २०२० |

**विषय क्र.७१**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२९६,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१७,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| अ.क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डीआसी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ. मी. | डीआरसी क्र. | **डीआरसी दिल्याचा महिना** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे वडगांव बुद्रुक स.नं. ५७/५ | प्रायमरी स्कूल(पीएस–४८) | १)श्री.राजीव मनोहर भिडे २)श्री.शेखर मनोहर भिडे | विरळ वस्ती | २१४८.६१ चौ. मी. | २१४८.६१चौ.मी X २.१५= ४६१९.५१ चौ.मी. १५००.०० १५००.०० १६१९.५१ | ००५७४७ ००५७४८ ००५७४९ | मार्च २०२० |

**विषय क्र.७२**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२९७,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१८,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| अ. क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डीआसी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ. मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स.नं.४अ/३अ/१ब/१,३अ/२/१,३अ/२/२,३ब,३क/१,३क/२,३ड/१,३ड/२,३ई सि.स.नं. ११३०,११३२ हडपसर गाडीतळ,पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.भोसले तुपे डेव्हलपर्स | सुधारीत नियमावली तील कलम १५ (१) नुसार झोन नाहीत | १८७९.१७ चौ.मी. झोपडपट्टी पुनर्वसनाच्या "ए", "बी" विंगकरीता जोते पूर्णत्वापोटी २५ % आरसीसी वीट बांधकामापोटी ३५ % व अंशतः भोगवटा आदा केले पोटी ३० % असा एकूण ९० % देय टिडीआर | ००४५९१ | मार्च २०२० |

**विषय क्र.७३**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१२९९,दि.२४/३/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१९,दि.१६/६/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात आहे.

| **अ क्र** | **मिळकतीचा तपशील** | **आरक्षणाचा प्रकार** | **डीआसी होल्डरचे नाव** | **टिडी आर झोन** | **७/१२ नुसार झोन** | **टिडीआर देय क्षेत्र चौ. मी.** | **डीआरसी क्र.** | **डीआरसी दिल्याचा महिना** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे वडगांव बुद्रुक स.नं. ५७/६क (पै) | १)गार्डन (जी-११) २)नाला गार्डन (एनजी-४) | १)श्री.राजीव मनोहर भिडे २)श्री.शेखर मनोहर भिडे | विरळ वस्ती | ३५०४.०० चौ.मी. | १) गार्डन (जी-११) ने आरक्षित ३१०८.०० चौ.मी. x २.१५ = ६६८२.२ चौ.मी.<br>२) नाला गार्डन (एनजी-४) आरक्षित ३९६.०० चौ.मी. x २.०० x ५०%= ३९६.०० चौ.मी. + प्रोत्साहनपर टिडीआर ३९६.०० x ०.१५ = ५९.४ = ४५५.४ चौ.मी. असे एकूण = ७१३७.६ चौ.मी.<br>१६७०.५५<br>१६७०.५५<br>१६७०.५५<br>१६७०.५५<br>४५५.४ | ००५७४२<br>००५७४३<br>००५७४४<br>००५७४५<br>००५७४६ | मार्च २०२० |

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ७/७/२०२०

**राजेंद्र शेवाळे**
**उपनगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सूचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.**